

नागपुरात महाविकास आघाडीत मोठी फूट (पान २ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



उमेदवार शक्तिप्रदर्शन करत आला, पण अर्जच विसरला (पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com बुधवार दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अंक : १४७ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### शरद पवारांच्या आमदाराचा मुलगा आणि सून भाजपच्या तिकिटावर निवडणुकीच्या रिंगणात



पुणे : पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे शहरात निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या चेहऱ्यांपैकी अनेक नवे चेहरे समोर आले आहेत. यामध्ये शहराच्या राजकारणात विशेष लक्ष वेधून घेतल आहे ते वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाने. या विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे बापूसाहेब पठारे हे आमदार आहेत. बापूसाहेब पठारे हे जरी शरद पवारांच्या पक्षात असले तरी त्यांच्या कुटुंबाने मात्र कमळ हाती घेतलं आहे.बापूसाहेब पठारे यांचे सुपुत्र सुरेंद्र पठारे यांनी काही दिवसांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र प्रत्यक्षात उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर सुरेंद्र पठारे यांच्या सोबत त्यांच्या पत्नी ऐश्वर्या पठारे या देखील भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवणार असल्याचं समोर आलं आहे. ऐश्वर्या पठारे या प्रभाग क्रमांक तीनमधून निवडणूक लढवत आहेत. तर सुरेंद्र पठारे हे प्रभाग क्रमांक चारमधून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे शरद पवारांच्या आमदारांच्या घरातच त्यांचा मुलगा आणि सून हे भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवत असल्याने शहराच्या राजकारणात याची विशेष चर्चा रंगली आहे.

### गद्दाराला उभा करु नका! माजी नगरसेवकानं ठाकरेंची साथ सोडली



मुंबई: माजी नगरसेवक अनिल कोकीळ यांनी उद्धव ठाकरे ची साथ सोडत शिंदेसेनेत प्रवेश केल्यानं ज्येष्ठ शिवसैनिकानं संताप व्यक्त केला. शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी नाकारल्यानं अनिल कोकीळ यांनी ठाकरेंची साथ सोडत शिंदेसेनेची वाट धरली. आज त्यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला. त्यानंतर प्रभागातील ज्येष्ठ शिवसैनिकानं कोकीळ यांनी दिलेली बॅग आणि साहित्याची होळी केली.प्रभाग क्रमांक २०४ मधून उद्धव ठाकरेंनी अनिल कोकीळ यांना उमेदवारी नाकारली. त्यानंतर कोकीळ यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला. यानंतर ज्येष्ठ शिवसैनिक संजय गुरव यांनी संताप व्यक्त केला. कोकीळ यांनी दिलेली बॅग त्यांनी पेटवून दिली. गद्दाराला हाकलून द्या, त्याला कुठेही उभा करु नका, अशा शब्दांत संजय गुरव यांनी त्यांचा संताप व्यक्त केला. गद्दार माणसाला कधीही जवळ करु नका. शिवसेनेसाठी त्यानं काम केलं होतं. पण आता तो काही उपयोगाचा नाही, अशा भावना ज्येष्ठ शिवसैनिकानं व्यक्त केल्या. त्या गद्दाराला तुम्ही हाकलून द्या. त्याला इथे उभा करु नका. गद्दाराला कधी माफ करु नका. आम्ही रक्ताचे सैनिक आहोत. आम्ही कोणाला सोडणार नाही, असा इशाराच गुरव यांनी दिला.

### हृदयविकाराच्या झटक्याने एका उमेदवाराचा अचानक मृत्यू

मिरा-भाईंदर महापालिका निवडणुकीसाठी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करून बाहेर पडल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने एका उमेदवाराचा अचानक मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जावेद पठाण (६६) असे मृत उमेदवाराचे नाव आहे. या घटनेवर शहरवासीयांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. मिरा रोड च्या नया नगर भागातील निवडणूक कार्यालयात पठाण मंगळवारी दुपारी राष्ट्रवादी पक्षाकडून प्रभाग क्रमांक २२ मधून अर्ज दाखल करण्यास त्यांच्या समर्थकांसह दाखल गेले होते. येथे काही वेळाने अर्ज दाखल करून पठाण बाहेर पडले.

# पालकमंत्री पुण्याचे की गुन्हेगारांचे, गुन्हेगारी मुक्त पुणे करण्याचा दादांचा वादा गेला कुठे?

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे: राज्यभरातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी पुण्यात राजकीय नाट्य पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने (AP) जाहीर केलेल्या उमेदवारी यादीमुळे शहरात चर्चेला उधाण आले आहे. गुन्हेगारीमुक्त पुण्याच्या गप्पा मारणाऱ्या अजित पवारांच्या पक्षाने थेट कुख्यात गुंड आणि गंभीर गुन्ह्यातील आरोपींच्या नातेवाईकांना निवडणुकीच्या मैदानात उतरवल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. गुन्हेगारांना टायरमध्ये घाला, तुम्हाला गाड्या घोड्या दिल्यात कोयता गँगचा बंदोबस्त करा नाहीतर बघतोच तुमच्याकडे, कोयता गँग दिसली तर तुमची काय बरी गत नाही. अशा एक ना अनेक वल्गना करणाऱ्या अजित पवारांचं नक्की काय चाललंय हे समजायला मार्ग पुणेकरांना राहिला नाही. अजित पवार पुण्याचे पालकमंत्री आहेत की गुन्ह्याचे? हा प्रश्न विचारण्याची वेळ आता आली आहे.

कारण पुण्यातील कुख्यात गुंड बापू उर्फ कुमार प्रभाकर नायर याने प्रभाग क्रमांक ३९ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) तिकीटावर आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विशेष म्हणजे, २०२० मधील युवासेना नेते दीपक मारटकर हत्या प्रकरणात बापू नायरचे नाव समोर आले होते. या हत्येचा कट रचल्याच्या संशयावरून त्याला अटकही झाली होती. २०२१ मध्ये तो बाहेर आल्यानंतर पुन्हा या प्रकरणात अडकला आणि २०२४ मध्ये जामिनावर बाहेर आला. आता थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीने त्याला अधिकृत उमेदवारी दिल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

केवळ बापू नायरच नव्हे, तर 'गँगवॉर'ची पार्श्वभूमी असलेल्या आंदेकर टोळीलाही अजित पवारांनी बळ दिले आहे. आयुष कोमकर हत्या प्रकरणात सध्या तुरुंगात असलेल्या सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर यांना प्रभाग २३ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. या दोन्ही महिला तुरुंगातूनच निवडणूक लढवणार आहेत. याशिवाय, पुण्यातील कुख्यात गुंड गजा मारणे याच्या पत्नी जयश्री मारणे यांनाही अजित पवार गटाने उमेदवारी देऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. काही महिन्यांपूर्वी गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची भाषा करणाऱ्या अजित पवारांनी आता चक्क गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना 'एबी फॉर्म' वाटल्याने विरोधकांनी त्यांच्यावर टिकेची झोड उठवली आहे. "गुन्हेगारांना टायरमध्ये घालण्याची भाषा करणारे पालकमंत्री आता त्यांना पालिकेत का पाठवू पाहत आहेत?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.



दरम्यान, एकीकडे पुणे शहर आयटी हब आणि शिक्षणाचे केंद्र म्हणून विकसित होत असताना, दुसरीकडे महापालिका निवडणुकीत गुन्हेगारी टोळ्यांच्या सदस्यांचा सक्रिय सहभाग वाढत आहे. खंडणी, हत्या आणि धमकावण्याचे गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींना राजकीय आश्रय मिळाल्याने सामान्य मतदारांमध्ये भीती आणि अस्वस्थता पसरली आहे.

## भाजपची नातेवाईकांना तिकीट न देण्याची घोषणा कागदावरच!

### राहुल नार्वेकरांच्या कुटुंबात तिघांना उमेदवारी; भाजप उपाध्यक्षांकडून बंडखोरी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत आमदार-खासदारांच्या नातेवाईकांना तिकीट नाकारण्याची घोषणा भाजपने केली असली, तरी प्रत्यक्षात मात्र पक्षाला मोठ्या प्रमाणावर अंतर्गत बंडखोरीचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याच कुटुंबात तब्बल तीन जणांना उमेदवारी देण्यात आली असून, त्यांचे बंधू मकरंद नार्वेकर, वहिनी हर्षिता नार्वेकर आणि चुलत बहीण गौरवी शिवलकर-नार्वेकर रिंगणात आहेत. याव्यतिरिक्त भाजप नेते



प्रवीण दरेकर यांचा भाऊ आणि मुंबई भाजप अध्यक्षांच्या मेहुण्यालाही तिकीट मिळाल्याने, स्वतःचेच नियम धाब्यावर बसवणाऱ्या भाजपविरोधात कार्यकर्त्यांमध्ये आता नाराजीचा सूर उमटत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत अनेक ठिकाणी बंडखोरी उफाळून आल्याने महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. वॉर्ड क्रमांक 225 मध्ये भाजपच्या हर्षिता नार्वेकर यांच्यासमोर शिवसेनेच्या सुजाता सानप यांचे आव्हान असतानाच, आता भाजपचे मुंबई उपाध्यक्ष कमलाकर दळवी यांनीच बंडखोरी करत शड्डू ठोकल्याने नार्वेकर यांच्या मतांच्या विभाजनाची दाट शक्यता निर्माण झाली आहे. केवळ वॉर्ड 225 मध्येच नव्हे, तर प्रभाग क्रमांक 7 मध्येही शिवसेनेचे भूपेंद्र काशिनाथ कवळी यांनी बंडखोरी केल्याने तेथील भाजप उमेदवारासमोर पेच निर्माण झाला असून, मुंबईतील अशा वाढत्या बंडखोरीमुळे राजकीय गणिते बिघडण्याची चिन्हे दिसत आहेत.

## लढणार तर 'कमळ' चिन्हावरच; भाजप नेत्या अक्षता तेंडुलकरांची निवडणुकीतून माघार, शिवसेना शिंदे गटाकडून मिळाली होती ऑफर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई: भाजप नेत्या अक्षता तेंडुलकर यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीतून माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. वॉर्ड क्रमांक 192 मधून निवडणूक लढवण्यासाठी त्या इच्छुक होत्या, मात्र हा वॉर्ड महायुतीमध्ये शिवसेनेच्या वाट्याला गेल्याने पेच निर्माण झाला होता. शिवसेनेने तेंडुलकर यांना त्यांच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढण्याची अधिकृत ऑफर दिली होती. परंतु, 'कमळ' या आपल्या मूळ चिन्हाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही चिन्हावर निवडणूक लढवण्यास त्यांनी ठाम नकार दिला आणि पक्षाशी निष्ठा राखत निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट करत निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले.

अक्षता तेंडुलकर यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले की, एकमेव ओपन कॅटेगरीत असलेल्या वॉर्ड



क्रमांक १९२ मधून निवडणूक लढवण्यास मी इच्छुक होते, काल दुपारपर्यंत भाजपच्या नेत्यांनी हा वॉर्ड भाजपला लढवण्यास मिळावा यासाठी अतोनात प्रयत्न केले. मात्र महायुतीच्या निर्णयानुसार हा वॉर्ड शिवसेनेला मिळाला.

एक स्ट्राँग उमेदवार म्हणून शिवसेनेकडून मला हा वॉर्ड लढवण्यासाठी दुपारी ऑफर आली. त्यानुसार काही वरिष्ठांशी चर्चा करून या प्रयोगाविषयी चाचपणी करण्यात आली. याला अनुसरून काल आम्हाला सायंकाळी एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन बंगल्यावर बोलावण्यात आले होते, त्यानुसार आम्ही तिथे भेट दिली. शिवसेनेतून लढण्याच्या प्रक्रियेनुसार पक्षप्रवेश व AB फॉर्म वाटप, दोन्ही एकत्र होणार होते.

## अजित पवारांची दुटप्पी भूमिका?:गुन्हेगारी मुक्तीच्या वल्गना आणि जेलमधील आरोपींना 'एबी' फॉर्म; मुंबईतही शिंदेंपेक्षा जास्त उमेदवार

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई: गुन्हेगारांना टायरमध्ये घालू, अशा आक्रमक वल्गना करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगरपालिका निवडणुकीत मात्र आपली सर्व तत्त्वे धाब्यावर बसवल्याचे चित्र दिसत आहे. पुण्याला गुन्हेगारीमुक्त करण्याचे स्वप्न दाखवणाऱ्या पालकमंत्र्यांनी राजकीय फायद्यासाठी चक्क कुख्यात टोळ्यांशी संबंधित व्यक्तींना उमेदवारी जाहीर केली आहे. यामुळे अजित पवारांच्या शब्दांत आणि प्रत्यक्ष कृतीत मोठी तफावत असल्याचे स्पष्ट झाले असून, निवडणुकीच्या रिंगणात 'तत्वे' बाजूला ठेवून केवळ 'निवडून येण्याची क्षमता' या निकषावर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना झुकते माप देण्यात आल्याचे दिसत आहे.

पुण्यातील प्रभाग क्रमांक 23 मधून आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी सोनाली आणि लक्ष्मी आंदेकर यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाने उमेदवारी दिली असून, या दोघी आता जेलमधूनच निवडणूक लढवणार आहेत. यासोबतच कुख्यात गजा मारणे याच्या पत्नीलाही उमेदवारी देऊन पवारांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या घराण्यांवर सढळ हाताने मेहेरनजर दाखवली आहे. एका बाजूला गुन्हेगारांविरुद्ध कठोर भाषेचा वापर करायचा आणि दुसऱ्या बाजूला त्यांनाच उमेदवारी देऊन राजकीय प्रतिष्ठा मिळवून द्यायची, अशा दुटप्पी भूमिकेमुळे 'पालकमंत्री' म्हणून अजित पवारांच्या विश्वासार्हतेवर आता



मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.मुंबई महानगरपालिका निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेपेक्षा अधिक उमेदवार रिंगणात उतरवत महायुतीमध्ये स्वतःचे वजन वाढवले आहे. राष्ट्रवादीने मुंबईत एकूण 96 उमेदवार उभे केले असून शिंदे सेनेचे 90 उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आहेत. राष्ट्रवादीच्या या 96 उमेदवारांमध्ये 56 मराठी, 23 मुस्लिम, 11 उत्तर भारतीय, 3 ख्रिश्चन, आणि तेलगू, तमिळ व बोहरा मुस्लिम समाजाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश करून 'सोशल इंजिनिअरिंग' साधण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे, पक्षाने पुरुषांच्या तुलनेत महिलांना (50 महिला, 46 पुरुष) झुकते माप दिले असून, यात 12 अनुसूचित जाती आणि 17 ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना संधी देत सर्वसमावेशक चेहरा देण्याचा प्रयत्न केला आहे.मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गट आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीचा जागावाटपाचा फॉर्म्युला अखेर स्पष्ट झाला असून, यामध्ये ठाकरे गटाने सर्वाधिक 163 जागांवर आपले उमेदवार रिंगणात उतरवत वर्चस्व राखले

## शिंदेंचे 2 'धुरंधर' भाजपला नडले, जागावाटपात अडून बसले; 52 जागांची ऑफर असताना 90 जागा मिळवल्या

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई: राज्यभरातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अर्ज दाखल करण्याची लगबग सुरु झाली होती. ती आज संपली. बऱ्याच ठिकाणी बंडखोरांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरले आहेत. त्यामुळे प्रमुख पक्षांची डोकेदुखी वाढली आहे. मुंबईत शिंदेसेना-भाजप विरुद्ध ठाकरे बंधू असा थेट सामना होणार आहे. ठाकरे बंधूंची युती झाल्याचा फायदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उठवला आणि भाजप सोबतच्या चर्चेतून ९० जागा मिळवल्या. यात दोन नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.


मुंबई महापालिका निवडणूक



युती म्हणूनच लढणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीपासूनच सांगितलं होतं. पण जागावाटपाच्या पहिल्या फेरीत भाजपनं शिंदेसेनेला केवळ ५२ जागांचा प्रस्ताव दिला. शिंदेसेना १२५ जागांसाठी आग्रही असताना त्याच्या निम्म्या जागाही भाजपनं देऊ केल्या नाहीत. गेल्या निवडणुकीत शिवसेनेचे ८४ उमेदवार निवडून आले होते. पण तरीही भाजपनं ५२ जागांचा प्रस्ताव दिला.शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेच्या ४० हून अधिक नगरसेवकांनी ठाकरेंची साथ सोडली आणि शिंदे गटाची वाट धरली. अन्य पक्षातील २१ माजी नगरसेवकदेखील शिंदे यांनी गळाला लावले. त्यामुळे शिंदे यांच्याकडे ६० प्रभागांमधील माजी नगरसेवक होते. `

## सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार? : प्रकाश आंबेडकरांच्या विधानाने चर्चांना उधाण

### अदानी यांच्या मध्यस्थीने शरद पवार एनडीएमध्ये म्हणत वडेट्टीवारांचाही दुजोरा



**दिव्य वतन /वृत्तसेवा**

राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांच्या गदारोळात राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी महायुती तुटत असतानाच पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती फिस्कटल्याने वातावरण अधिकच तापले आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाच्या अगदी तोंडावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री होतील, असे थेट भाकीत करत त्यांनी शरद पवारांकडून धक्कातंत्र वापरले जाईल, असे संकेत दिले. त्यामुळे महापालिका निवडणुकांपुरती मर्यादित असलेली चर्चा थेट राष्ट्रीय राजकारणापर्यंत पोहोचली आहे.

महापालिका निवडणुकांमध्ये यंदा अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळत असून, राज्यातील 12 हून अधिक ठिकाणी महायुती कोलमडली आहे. भाजप आणि शिवसेना अनेक महानगरपालिकांमध्ये थेट एकमेकांविरोधात उभ्या ठाकणार आहेत. दुसरीकडे, पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती तुटल्याची अधिकृत घोषणा झाली आहे. जागावाटपावरून निर्माण झालेल्या मतभेदांमुळे ही युती फिस्कटल्याचे स्पष्ट झाले आहे. पुण्यातील पाटीलकीमुळे आमचे आणि काँग्रेसचे पटले नाही, असे स्पष्ट करत प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीला स्वबळावर निवडणूक लढवण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे पुण्याच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

युती तुटल्यानंतर माध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी केवळ स्थानिक राजकारणापुरतीच भूमिका मांडली नाही, तर थेट केंद्रातील सत्ताकारणावर भाष्य करत एक मोठा बॉम्ब टाकला. सुप्रिया सुळे लवकरच केंद्र सरकारमध्ये मंत्री होतील, असे भाकीत करत त्यांनी राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आणले. मुंबईत आमची आणि काँग्रेसची युती असल्यामुळे जर कोणी नाराज असेल, तर त्याची आम्हाला पर्वा नाही. आमच्यासाठी पक्ष महत्त्वाचा आहे, व्यक्ती नाहीत, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे शरद पवार कोणता मोठा राजकीय निर्णय घेणार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या भविष्यात काय घडणार, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत. सुप्रिया सुळे यांना केंद्रात मं[illegible] मिळाल्यास राज्याती[illegible]



## महत्त्वाचे...

### वाहतूक मार्गात बदल

नागपूर नववर्षाचे स्वागत नागपूर शहरात उत्साहाने करण्यात येणार आहे. नववर्षाचे स्वागत करण्याकरिता तरूण मुले व मुली तसेच नागरीक फार मोठया प्रमाणात रस्त्यावर येतात. विषेशतः तरूणाई जल्लोश करुन उत्साहाने, अति वेगाने वाहने चालवितात. म्हणून वाहतूक सुरळीत राहावी, लोकांचे जिवीतास धोका, गैरसोय निर्माण होऊ नये म्हणून खालील प्रमाणे वाहतूकीवर निर्बंध घालण्याकरिता अधिसूचना काढण्यात आली आहे.पुढील मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनास बंदी घालण्यात येत आहे. फुटाळा तलाव परिसरात तेलंगखेडी हनुमान मंदीर, वायुसेना नगर आणि फुटाळा वस्ती या बाजुकडून जोडणाऱ्या रस्त्याने सर्व वाहनाच्या रहदारीसाठी बंदी घालण्यात आली आहे. वेस्ट हायकोर्ट रोडवरील लॉ कॉलेज चौक ते शंकरनगर चौक या दरम्यानचे दोन्ही बाजुचे मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक आवश्यकते प्रमाणे बंद करण्यात येईल. बर्डी गोवारी उड्डान पुल, सदर उड्डाणपूल (काटोल रोड, मानकापूर), एल.आय.सी ते पिवळी नदी साई मंदीर उड्डानपुल, मेंहदीबाग उड्डानपुल, या पुलावरील दुतर्फा वाहतूक आवश्यकतेप्रमाणे सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येईल.या मार्गाने होणारी वाहतूक त्यावेळचे परिस्थीतीनुसार इतर मार्गाने वळविण्याचे अधिकार कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी/अंमलदार यांना राहतील.ही अधिसूचना दिनांक ३१ डिसेंबर सायंकाळी सहा वाजतापासून दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत अंमलात राहील.कमाल चौक ते पोलिस ठाणेपाचपावलीकमाल चौक ते पोलीस ठाणे पांचपावली कडे जाणारी संपूर्ण वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे. कमाल चौक कडून पोलीस ठाणे पांचपावली कडे जाणारी संपूर्ण वाहतूक कमाल टॉकीज वॉल कम्पाउंड कडुन उजवे वळण घेवुन सरळ सिंधु महाविद्यालय समोरून उजवे वळण घेवुन पोलीस ठाणे पाचपावली कडे सोईनुसार जातील. ही अधिसूचना ३१ डिसेंबर २०२५ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत अंमलात राहील.

# नागपुरात महाविकास आघाडीत मोठी फूट

## काँग्रेसने रात्री 3 वाजता युती तोडल्याचा अनिल देशमुखांचा आरोप; राष्ट्रवादीकडून 'एबी' फॉर्मचे वाटप



**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी नागपुरात महाविकास आघाडीला मोठे भगदाड पडले आहे. जागावाटपाच्या अनेक फेऱ्यांनंतर अखेरच्या क्षणी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यातील युती तुटल्याचे स्पष्ट झाले आहे. माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांनी काँग्रेसवर जाणीवपूर्वक दगाबाजी केल्याचा गंभीर आरोप करत, आता आमचा पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून नागपुरात काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्यात आघाडीबाबत चर्चा सुरू होती. काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांना प्रत्येकी 12 ते 15 जागा सोडण्याचे संकेत देण्यात आले होते. गेल्या निवडणुकीतील मतांची टक्केवारी आणि निवडून आलेले नगरसेवक या निकषांवर जागावाटप निश्चित झाल्याचा दावा राष्ट्रवादीकडून करण्यात आला होता. मात्र, अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसने अचानक माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

या घडामोडींवर संताप व्यक्त करताना अनिल देशमुख म्हणाले की, गेल्या चार-पाच दिवसांपासून सकारात्मक चर्चा सुरू होती. अगदी काल रात्रीपर्यंत जागांची यादी अंतिम झाली होती आणि दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या त्यावर स्वाक्षऱ्याही झाल्या होत्या. मात्र, काँग्रेसने रात्री 3 वाजता अचानक आणि एकतर्फी युती तोडल्याचा संदेश दिला. हे सर्व नियोजनबद्ध पद्धतीने आणि आम्हाला अडचणीत आणण्यासाठी जाणीवपूर्वक करण्यात आले आहे.

काँग्रेसच्या या भूमिकेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आता आक्रमक झाली आहे. आघाडी तुटल्याचे स्पष्ट होताच पक्षाने आपल्या इच्छुक उमेदवारांना तातडीने 'एबी' फॉर्मचे वाटप करून स्वतंत्रपणे अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, या बिघाडीमुळे केवळ राष्ट्रवादीच नव्हे, तर शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काँग्रेसची शिवसेनेसोबतची युती अद्याप टिकून आहे की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता मिळालेली नाही.

## नारसिंगी जुनी येथे लोक कलावंताचा मेळावा

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

काटोल - नुकताच मंजुळाबाई वानखेडे बहुउद्देशीय संस्था काटोल व राष्ट्रसंत सम्यक संदेश फाउंडेशन सातारा कुही यांच्या संयुक्तरीत्या लोक कलावंतांचा भव्य मेळावा हनुमान मंदिर भव्य प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन कीर्तनकार काळे महाराज यांनी केले,तर अध्यक्ष लोक कलावंत तथा राष्ट्रीय सचिव मंजुळाबाई वानखेडे बहुउद्देशीय संस्था चे राजू दादा वानखडे होते,तर प्रमुख अतिथी संजय गांधी मानधन समिती तहसील कार्यालय नरखेड सदस्य सुधाकर खजुरीये ,लोक कलावंत प्रकाश राऊत, सामाजिक कार्यकर्ता नितीन तायवाडे लोक कलावंत व तथा राष्ट्रीय सचिव राष्ट्रसंत साम्यक संदेश फाउंडेशन सातारा संदेश गणवीर मनोहर सोकुवर, विजय वानखेडे,सतीश खडसे तथा लोक कलावंत राष्ट्रीय सचिव रवी सोम कुवर समता बहुउद्देशीय संस्था उपस्थित होते.या कार्यक्रमात भारुड,भजन, लोकगीत व भीम गीत सादरीकरण केलेत या कार्यक्रमात तुषार बागडे, अजय सोमकुवर, उषा डाखोळे, सविता कडू,निर्मला नागोसे,मंदा अंबुडारे पुष्पा नागोसे,शारदा नेहारे ,कल्पना सहारे,मंगला सहारे,पुनम सहारे, वंदना वाढिवे,सीमा युनाते, अनुसूया गजवे, सुनिता सहारे,सुमित्रा सहारे, लीला वाघाडे इत्यादी कलावंतांनी उत्कृष्ट गायन करून कलावंतांनी श्रोत्यांचे मंत्र मग्न केलेत.या कार्यक्रमाचे संचालन सीमा वानखेडे केले.तर आभार लुमेश नेहारे यांनी मानले.




## चिमुकल्या मूकबधिर विद्यार्थ्यांसोबत केला अनोख्या प्रकारे वाढदिवस साजरा

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**



काटोल -नुकताच श्रीमती कविताताई सुभाषचंद्र गेडाम (गेडाम फाउंडेशनच्या सर्वेसर्वा ) यांचा वाढदिवस राजीव गांधी निवासी मूकबधिर विद्यालय येथे वही , पेन ,नोटपॅड व शैक्षणिक साहित्य मुलांना वितरीत करीत आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या अनोख्या कार्यक्रमांचे आयोजन इंजि.टि.एस. गेडाम साहेब व मित्र परिवारातर्फे करण्यात आले होते .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गृहमंत्री अनिलबाबू देशमुख हे उपस्थित होते.अनावश्यक खर्चाला आळा बसून तसेच समाजाचे आपण ऋणी आहोत समाजाला काही देणं असत. येवढच नव्हे तर ही आजची काळाची गरज आहे. हे उदिष्ट लक्षात घेऊन वाढदिवसाच आयोजन करण्यात आले होत. तसेच रांजल्या गांजलेल्या , पिचलेल्या लोकांना आधार देण्याचे काम आधीपासूनच इंजि. गेडाम तसेच त्यांच्या मातोश्री श्रीमती कविताताई यांचे सुरू आहे. ते प्रत्यक्षात या वाढदिवसा निमित्ताने दिसून आले. तसेच या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाला हा सामाजिक उपक्रम खूप आवडला. तसेच वाढदिवस थाटामाटात न करता सामाजिक कार्यातून आम्हीसुधा करू असे आश्वासन सगळयांनी दिले. आणि असा उपक्रम सर्वांची दिशा दृष्टीकोन बदलणारे नक्कीच ठरेल असे वाटते.

तसेच गेल्या अनेक वर्षा पासून गेडाम फाउंडेशन वतीने त्यांच्या आई श्रीमती कविताताई गेडाम अनेक सामाजिक उपक्रम राबवित आहे व समोर सुद्धा मोठ्या प्रमाणात राबविणार आहे हे विशेष. तसेच गेडाम कुटुंबाचे शिक्षण क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात मोठे नाव आहे. तसेच कविता ताई यांचा वाढदिवस दिव्यांग मुलांच्या हस्ते केक कापून करण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती संजय डांगोरे, बाजार समितीचे माजी सभापती बाबा शेळके,नगरसेवक विजय महाजन,नगरसेवक गणेश चन्ने , गणेश सावरकर,अजय लाडसे,परेश शेळके,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राऊत सर,राठी सर, राऊत सर,रविंद्र गेडाम,देवेंद गेडाम,छत्रपती शेळके,पुरुषोत्तम घोरमाडे, चेतन उमाठे,शिंगाणे सर, काळे सर,कोमल सरोदे,मनोज लुंगे, काळमेघ सर, बोंद्रे सर, Ridhorkar सर तसेच लक्ष्मी नगर मधील महिला वर्ग तसेच नगरवासी व विद्यालयाचे शिक्षण गण सोबत विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन वैशाली सावरकरनी केले तर आभार प्रदर्शन रविंद्र गेडाम सरांनी केले. तसेच येणाऱ्या काही महिन्यात काही जिल्हा मध्ये बँकिंग क्षेत्रा मधील Credit Societies व Cooperative Banks चे शुभारंभ लवकरच होणार आहे हे विशेष

## प्रभाग 26 मध्ये ऐनवेळी उमेदवारी बदलल्याने काँग्रेसमध्ये खळबळ - काँग्रेसमधील निष्ठावंत कार्यकर्त्यांची तीव्र नाराजी

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

नागपूर. नागपूर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २६ मधील काँग्रेस पक्षात मोठी अंतर्गत खळबळ उडाली आहे. या प्रभागातून अनेक वर्षांपासून पक्षाशी एकनिष्ठ असलेले राजू भेंडे यांना उमेदवारी मिळेल, अशी अपेक्षा असताना नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणी, मंगळवार ३० डिसेंबर रोजी त्यांची उमेदवारी अचानक नाकारण्यात आली. विशेष म्हणजे निवडणुकीच्या अगदी तोंडावर भाजपचे माजी नगरसेवक प्रवीण नरड यांना काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आल्याने निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. राजू भेंडे हे गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस संघटनेत सक्रिय असून प्रभागातील जनतेशी त्यांचा थेट संपर्क आहे. स्थानिक पातळीवर पक्षवाढीसाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यामुळे उमेदवारीचा हक्क त्यांनाच मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांना होता. मात्र पक्ष नेतृत्वाने ऐनवेळी घेतलेल्या या निर्णयामुळे कार्यकर्ते संभ्रमात पडले असून पक्षाच्या धोरणावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, भाजपमधून आलेल्या उमेदवाराला थेट तिकीट देणे म्हणजे जुने कार्यकर्ते डावलल्यासारखे आहे. यामुळे तळागाळातील कार्यकर्त्यांचे मनोबल खचले असून काहींनी उघड नाराजी व्यक्त केली आहे. काही कार्यकर्त्यांनी तर हा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी पक्ष नेतृत्वाकडे केली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे प्रभाग क्रमांक २६ मध्ये काँग्रेसच्या निवडणूक प्रचारावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अंतर्गत नाराजीचा फायदा विरोधकांकडून घेतला जाऊ शकतो, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पक्ष नेतृत्व यावर काय भूमिका घेते आणि नाराज कार्यकर्त्यांची समजूत काढली जाते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## नागरिकांचा आशीर्वाद हाच आधार—काँग्रेस एकटीच 100 नगरसेवकांसाठी रणसज्ज

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूरः नागपूर महानगरपालिका निवडणूक–२०२६ साठी काँग्रेस पक्षाने सर्व १५१ प्रभागांत उमेदवार उभे केले असून, नागरिकांच्या आशीर्वादाने १०० नगरसेवक निवडून आणण्याचे ठाम लक्ष्य निश्चित केले आहे. गेल्या १९ वर्षांतील भाजपच्या अपयशी, भ्रष्ट आणि जनविरोधी कारभारामुळे त्रस्त झालेल्या नागपूरकरांना बदल हवा आहे, आणि तो बदल केवळ काँग्रेसच देऊ शकते, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी प्रसिद्धीपत्रकात सांगितले की, कोविड-१९ महामारीसारख्या कठीण काळात प्राणांची पर्वा न करता नागरिकांच्या मदतीला धावून गेलेले, रुग्ण, नातेवाईक, गरीब व गरजू घटकांसाठी सातत्याने कार्यरत राहिलेले आणि संपूर्ण राजकीय आयुष्यात आपल्या प्रभागातील हर एक घटकासाठी झटणारे तळागाळातील कार्यकर्ते यांनाच काँग्रेसने उमेदवारी दिली आहे.

“हे उमेदवार केवळ निवडणुकीपुरते नव्हे, तर वर्षानुवर्षे नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी राहिलेले आहेत. त्यामुळे नागपूरकर नक्कीच त्यांना भरभरून आशीर्वाद देतील आणि आपल्या प्रभागाची जबाबदारी त्यांच्या हाती नगरसेवक म्हणून सोपवतील,” असे ठाकरे म्हणाले.ते पुढे म्हणाले की, भाजपच्या १९ वर्षांच्या अपयशामुळे मूलभूत सुविधा कोलमडल्या, शहराचा विकास खुंटला आणि नागपूरकरांचा विश्वास तुटला.

याउलट काँग्रेस स्वच्छ, स्मार्ट, समावेशी आणि जनहितकारी नागपूर घडवण्यासाठी ठोस आराखड्यासह निवडणुकीला सामोरी जात आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी घेतला विद्यार्थ्यासोबत मध्यान भोजनाचा आस्वाद



**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

मौदा - मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा आढावा घेण्याकरता दिनांक 30 डिसेंबर 2025 ला माननीय विनायक महामुनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर व माननीय कपिल कलोडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मौदा गट विकास अधिकारी डॉक्टर महेश बेहेकर यांनी आपल्या आढावा दौरा दरम्यान जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिरवा केंद्र बोरगाव येथे भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेत असलेल्या भौतिक सुविधा, उपलब्ध असलेली शैक्षणिक व डिजिटल साधने, स्वच्छतागृह व हॅन्ड वॉश स्टेशन इत्यादी सोबतच विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या माध्यान्ह भोजन योजनेचा सुद्धा आढावा घेतला. शाळेत असलेली परसबाग त्यातील भाजीपाल्याचा दररोजच्या आहारात केला जाणारा उपयोग, स्वयंपाक खोलीची व भांड्यांची स्वच्छता, वापरन्यात येणारा धान्यसाठा इत्यादी चा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना जेव्हा मध्यान्न भोजना करता सुट्टी झाली तेव्हा माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब आपल्या सोबत असलेल्या सर्व अधिकारी यांच्यासोबत चक्क विद्यार्थ्यांसोबत पंगतीत बसून विध्यार्थाना मिळत असलेला आहार स्वतः ग्रहण केला. विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या ताटातच त्यांनी भोजन केले. विद्यार्थ्यांना पिण्यास मिळत असलेले पाणी स्वतः पिले. यावेळी त्यांना शाळेतील शिक्षिका व केंद्रप्रमुख श्री जुगलकिशोर बोरकर यांनी पंगतीचे वाढन केले. यावेळी त्यांनी स्वयंपाक बनवणारे कर्मचारी यांची पण स्तुती केली आणि मुख्याध्यापिका सौ सुवर्ण ठोंबरे यांना चव रजिस्टर मागवून त्या रजिस्टरवर चवदार अन्न असा शेरा मारून स्वतः सही केली. यावेळी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती मौदा श्री संकेत मरसकोल्हे, शिक्षण विस्तार अधिकारी सौ ललिता चामट, केंद्रप्रमुख बोरगाव श्री जुगलकिशोर बोरकर, व शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. वर्गात जाऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधले. याच प्रमाणे त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मारोडी येथे सुद्धा भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ माधुरी चौधरी व शिक्षक श्री महेंद्र हेडाऊ यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## नायलॉन मांजाच्या हौसेपायी आणखी किती जीव गमवावे लागणार?

### ‘नायलॉन मांजा मुक्त’ पतंगोत्सव साजरा करा- प्रशासनाचे आवाहन


**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : संक्रांतीच्या सणानिमित्त अनेक ठिकाणी पतंगोत्सव साजरा केला जातो. अर्थात, या पतंगोत्सवाची धूम संक्रांतीच्या एक आठवडा अगोदर आणि नंतरही कायम राहते. मात्र, अलिकडेच्या काही वर्षात या पतंगोत्सवाला जीवघेण्या नायलॉन मांजाचे ग्रहण लागले आहे. मांजाने गळा कापला गेल्याने कुटुंबातील निरासग मुले गमवावी लागल्याची काही उदाहरणे नागपुरात आहेत. वेळेत उपचार शक्य झाल्याने अनेकांचे प्राण वाचले खरे, पण त्यानंतर काहींचे आयुष्यच पूर्णपणे बदलून गेल्याची उदाहरणे आहेत. पतंगबाजीत वापरला जाणारा नायलॉन मांजा कर्दनकाळ ठरतोय. आपला शौक कुणाच्या जीवावर उठतोय का, यावर शौकिनांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. २० वर्षांच्या अनमोल (नाव बदलेलं आहे) या तरुणाने नुकताच पॉलिटेक्निकचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. व्यवसायाने इलेक्ट्रिशियन असलेल्या आपल्या वडीलांच्या कामात हातभार लावण्याची स्वप्न तो बघत होता. अशातच वडीलांसोबत दुचाकीने घरी परत येत असताना रामबाग ते जाटतरोडी दरम्यान अनमोलच्या हेल्मेटमध्ये नायलॉनचा मांजा अकडला. गळ्यात अडकलेला मांजा काढण्याची त्याची धडपड सुरु असताना दुसऱ्या बाजुने मांजा जोरात खेचला जात होता. त्यात अनमोलचा गळा चिरून ते गंभीर जखमी झाला. रक्ताची धार लागली होती. अशातच त्याला एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण तोवर बराच उशीर झाला होता. अनमोलची प्राणज्योत आधीच मालवल्याचे आढळून आले. त्याच्या श्वसननलिकेसह गळ्यातून मेंदूकडे रक्तपुरवठा करणारी रक्तवाहिनीही कापल्या गेली होती. त्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. अनमोलच्या कुटुंबावर हा मोठाच आघात होता. अशीच आणखी एक घटना २०२३ च्या जानेवारी महिन्यात घडली. अंकूर (नाव बदललेलं आहे) या १० वर्षीय मुलाचा गळ्यात नायलॉन मांजा अडकून मृत्यू झाल्याची घटना घडली. जरीपटका परिसरात राहणारा अंकूर हा त्याच्या वडीलांच्या गाडीवर बसून घराकडे जात असताना त्याच्या गळ्यात मांजा अडकला. श्वसननलिका आणि मेंदूला रक्तप्रवाह करणारी रक्तवाहिनी कापल्या गेल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्यावर शस्त्रक्रिया केली. मात्र, त्याचा उपयोग झाला नाही. चोवीस तास मृत्यूशी झुंज दिल्यावर अखेर दुसऱ्या दिवशी त्याची प्राणज्योत मालवली. या दुदैवी घटनांमधील कुटुंबियांची काय अवस्था झाली असेल? मांजामुळे गंभीर जखमी होण्याच्या घटनांची नोंद शहर पोलिसांकडे आहे. २०२२ मध्ये धंतोली परिसरात १८ वर्षीय किशोरवयीन मुलगा नायलॉन मांजामुळे गंभीर जखमी झाला होता. इमामवाडा परिसरात एक मध्यमवयीन व्यक्ती मांजामुळे गंभीर जखमी झाला होता. अगदी याच वर्षी काही दिवसांपूर्वी शांतीनगर परिसरात राहणारा मांजामुळे एका तरुणावर गंभीर जखमी होण्याची पाळी आली. अशाप्रकारे जखमी होणाऱ्यांची संख्या प्रत्यक्षात कितीतरी मोठी आहे. या काळात मांजामुळे जखमी झालेले बरेच लोक विशेषतः

तरुण उपचारांसाठी येतात, अशी माहिती रुग्णालयांचे अधिकारी देतात. याशिवाय मांजापायी मृत्यूमुखी पडणाऱ्या आणि जखमी होणाऱ्या पक्ष्यांची संख्याही दरवर्षी मोठी असते. नायलॉन मांजावर फार पूर्वीच बंदी घातली गेली आहे. तरीही, छुप्या पद्धतीने बाजारात या मांजाची विक्री होते. शहर पोलिसांनीही विक्रेत्यांवर मोठ्या प्रमाणात छापे घालून मांजा जप्त करण्याची कारवाई केल्याची असंख्य उदाहरणे आहेत. पोलिसांकडून जप्त होणाऱ्या नायलॉन मांजाचे बाजारमूल्य लक्षात घेतले तर ते काही लाखांमध्ये जाईल. पण, यात कुठेतरी जीव लाखमोलाचा आहे, ही जाणीव बाळगण्याची वेळ आलेली आहे. न्यायालयांनाही या प्रकाराची अत्यंत गांभीर्याने दखल घ्यावी लागली आहे. नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्या मुलांच्या पालकांना तब्बल ५० हजार रुपयांचा तसेच विक्रेत्यांवर सुमारे अडीच लाख रुपयांचा दंड ठोठावण्याचा इशारा अलिकडेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अलिकडेच दिला आहे. पोलिस यंत्रणेनेही अत्यंत कठोर कारवाईचा इशारा दिलेला आहे. काही स्वयंसेवी संघटनांनीही नायलॉन मांज्याविरोधात जनजागृती घडवून आणण्याची जबाबदारी हाती घेतली आहे. प्रशासनाकडूनही या विषयावर लोकांमध्ये जनजागृती करण्याचे प्रयत्न व्यापक स्तरावर सुरु आहेत. अशा परिस्थितीत स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या नायलॉन मांजाचा प्रसार रोखण्याची सामुदायिक जबाबदारी तरुणांसह त्यांच्या पालकांची देखील आहे. मांजामुळे एखाद्या कुटुंबातील तरुणावर, कर्त्या व्यक्तीवर जीव गमावण्याची पाळी येऊ नये, याची काळजी घेण्याची जबाबदारी साऱ्यांचीच आहे. त्यादृष्टीने साऱ्यांची सावध होण्याची आणि डोळस राहून आपली भूमिका बजावण्याची वेळ आली आहे. ज्या कुटुंबांनी नायलॉन मांजापायी घरातील तरुण किंवा किशोर वयीन मुले गमावली, अगदी त्यांचीही निश्चितपणे हीच भावना असणार. त्यामुळे आपली पतंगबाजीची हौस भागविताना नायलॉन मांजा अथवा कुठल्याही स्वरुपाच्या घातक मांजाला ‘ना’ म्हणून मकर संक्रमणाचा सकारात्मक संदेश नागपूरकरांनी देण्याची गरज आहे.

## महत्त्वाचे...

### जिल्ह्यात नायलॉन मांजाच्या निर्मिती, वापर व विक्रीवर कायमस्वरुपी बंदी



बुलढाणा : मकर संक्रांतीच्या कालावधीत पतंग उडविण्याचे प्रमाण वाढत असून त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉन मांजामुळे मानवी जीवितास तसेच पशु-पक्ष्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होत आहे. नायलॉन मांजामुळे जखमी व मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियमाअंतर्गत संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात नायलॉन मांजाची निर्मिती, वापर, विक्री व साठवणुकीवर कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणुकदार यांना नायलॉन मांजाची विक्री व साठवणुक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस विभाग यांनी स्वतंत्ररित्या पथके तयार करुन आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर आदेशाचे कोणतीही व्यक्ती वा संस्था यांनी उल्लंघन केल्यास पर्यावरण(संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 अन्वये शिक्षेस पात्र राहिल, असे जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद आहे.

### मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत बोंडगाव शाळेत चिऊताई घरकुल योजना

शेगाव- निसर्ग आणि मानवी जीवन यांचे अतूट नाते अधोरेखित करणारी मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत चिऊताई घरकुल योजना ही पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत स्तुत्य व अनुकरणीय उपक्रम ठरत आहे. दिवसेंदिवस दुर्मिळ होत चाललेल्या चिमणीसाठी सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारी ही योजना केवळ पक्षीसंरक्षणापुरती मर्यादित न राहता समाजात पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणारी ठरली आहे. शहरीकरण, सिमेंटची वाढती जंगले, झाडांची तोड आणि नैसर्गिक अधिवासांचा ऱ्हास यामुळे चिमणीसारख्या छोट्या पक्ष्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. अशा पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत चिऊताई घरकुल योजनेअंतर्गत कृत्रिम घरटी बसवून चिमणीला सुरक्षित आश्रय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. लहानशी वाटणारी ही कृती भविष्यात मोठा पर्यावरणीय बदल घडवू शकते, हेच या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करते.हा उपक्रम बोंडगाव येथील शाळेत उत्साहात आयोजित करण्यात आला. यावेळी पक्षीप्रेमी गुरव सर यांच्या हस्ते चिमणीसाठी घरट्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांसह उपस्थित नागरिकांना चिमणीचे महत्त्व, तिचे घटते अस्तित्व आणि संरक्षणाची गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक बळकट करण्यासाठी वृक्षारोपणाचा कार्यक्रमही पार पडला.या कार्यक्रमास बोंडगावच्या सरपंच सौ. शीतल थारकर, शिवसेना शेगाव तालुका प्रमुख श्री. रामा पाटील थारकर, शाळा समिति अध्यक्ष प्रविण इलामे, काकड सर, काकड मॅडम तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली.

### अमरावती जि.प. निवडणूक लांबणीवर

अमरावती- आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक झाल्यामुळे अमरावती जिल्हा परिषदेची निवडणूक लांबणीवर पडणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे. सूत्रानुसार मनपा निवडणुकांची उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्याबरोबर जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांचा पहिला टप्पा घोषित केला जाणार आहे.

# महाराष्ट्राच्या 59व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या स्वेच्छा सेवांचा भव्य शुभारंभ; यावर्षी ऐतिहासिक निरंकारी संत समागम सांगली नगरीत

## शेगांव तथा बुलडाणा जिल्ह्यासह महाराष्ट्रातून हजारो सेवादल व भक्तगण सेवेसाठी उपस्थित

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

शेगांव - सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन सान्निध्यात महाराष्ट्राचा 59वा वार्षिक निरंकारी संत समागम भव्यदिव्य स्वरुपात दिनांक 24, 25 व 26 जानेवारी, 2026 रोजी सांगली ईश्वरपुर रोड, प्रकाश ॲग्रो समोर, लोकरे पेट्रोल पंपा नजिक, सांगलवाडी, सांगली (महाराष्ट्र) येथील विशाल मैदानांवर आयोजित करण्यात येत आहे. सत्याचा बोध प्राप्त करुन आत्ममंथन करत जीवनाची वास्तविकता जाणून मनुष्य जन्माच्या मुख्य उद्देशाकडे अग्रेसर होऊन विश्वामध्ये प्रेम, बंधुत्व, शांती व सौहार्दाचे वातावरण निर्माण करणे हे या समागमाचा मुख्य उद्देश आहे. सुमारे 350 एकराच्या विशाल प्रांगणात आयोजित होत असलेल्या या भव्य आध्यात्मिक आयोजनाच्या तयारीसाठी स्वैच्छिक सेवांचा विधिवत शुभारंभ संत निरंकारी मिशनच्या सेवादलाचे मुख्य संचालक श्री.एस.के.जुनेजा जी यांच्या शुभहस्ते फावड्याने मैदानावरील माती काढून करण्यात आला. या प्रेरणादायी समारोहाचा प्रारंभ सतगुरुंचा जयघोष व निराकार ईश्वराच्या प्रार्थनेने करण्यात आला. त्यानंतर हजारोंच्या संख्येने उपस्थित सेवादल स्वयंसेवकांद्वारे सतगुरु प्रार्थनेचे गायन करण्यात आले. या प्रसंगी मिशनच्या प्रचार-प्रसार विभागाचे मेंबर इंचार्ज, आदरणीय श्री.मोहन छाब्रा जी, प्रचार विभागाचे समन्वयक श्री. हेमराज शर्मा, समागम समितीचे चेअरमन श्री शम्भुनाथ तिवारी, समन्वयक श्री नंदकुमार झांबरे, समितीचे अन्य सदस्य आणि महाराष्ट्रातील सर्व झोनल इंचार्ज, सर्व सेवादल क्षेत्रीय संचालक उपस्थित होते. शेगांव तथा बुलडाणा जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या हजारों निरंकारी भक्तगणांनीही या समारोहामध्ये भाग घेतला. स्वेच्छा सेवांच्या उद्घाटन प्रसंगी आपले भाव व्यक्त करताना आदरणीय एस के जुनेजा जी म्हणाले, की हा संत समागम सांगली नगरीसाठी एक ऐतिहासिक क्षण बनून राहील. सेवादल स्वयंसेवकांनी समागम समितीच्या निर्देशानुसार खांद्याला खांदा लावून निरंतर सेवा करत या मैदानाला सुंदर रूप द्यावे आणि लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांसाठी उत्तम व्यवस्था तयार करावी. प्रचार प्रसार विभागाचे मेंबर इंचार्ज मोहन छाब्राजी यांनी समस्त मानवतेला संत समागमाच्या शुभकामना व्यक्त करताना सांगितले, की सतगुरु मानवमात्राचे कल्याण करण्यासाठी जगामध्ये प्रकट होत असतो. या संत समागमाद्वारे तोच दिव्य संदेश दिला जाणार आहे जो पुरातन काळापासून संत-महात्म्यांनी व गुरु-पीर-प्रेषितांनी मानवमात्राला दिला आहे. हा संत समागम समस्त मानवतेसाठी कल्याणकारी व्हावा आणि त्यामधील संदेशाने मानवाने वेळीच जागृत व्हावे व आपल्या जीवनाचे सार्थक करावे, असे ते शेवटी म्हणाले. महाराष्ट्रात वार्षिक निरंकारी संत समागमांची परंपरा फार जुनी आहे. 1968 मध्ये महाराष्ट्राचा पहिला संत समागम मुंबईतील प्रसिद्ध शिवाजी पार्क मैदानावर आयोजित करण्यात आला व त्यानंतर सतत 52 वर्षे हा संत समागम मुंबई



महानगर प्रदेशातच होत राहिला. त्यानंतर सन 2020 मध्ये 53वा संत समागम नाशिक मध्ये झाला तर 56वा संत समागम छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आला. त्यानंतर 57वा संत समागम नागपुर नगरीत झाला आणि मागील वर्षी 58वा संत समागम आयोजित करण्याचे सौभाग्य विद्येचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या पुणे नगरीस लाभले.

यावर्षीच्या 59व्या समागमाचे आयोजन करण्याचे सौभाग्य सांगलीकरांना प्राप्त झाले आहे. समालखा (हरियाणा) येथे आयोजित विश्वस्तरिय 78व्या वार्षिक निरंकारी संत समागमानंतर प्रतिवर्षाप्रमाणे प्रत्येक भक्त महाराष्ट्राच्या 59व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत.

हा दिव्य संत समागम पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून निरंकारी सेवादलाचे स्वयंसेवक व अन्य भक्तगण हजारोंच्या संख्येने मोठ्या श्रद्धेने समागम स्थळी येऊन तन्मयतेने समागमाच्या पूर्वतयारीसाठी आपल्या सेवा अर्पण करत राहतील.

# चारित्र्याच्या संशयाने रक्तरंजित थरार!; झोपेत असलेल्या पत्नी व चार वर्षीय चिमुकल्याचा कुऱ्हाडीने निर्घृण खून

मेहकर - चारित्र्यावर संशय घेऊन पतीनेच आपल्या झोपेत असलेल्या पत्नीचा आणि अवघ्या चार वर्षीय चिमुकल्या मुलाचा कुऱ्हाडीने वार करून निर्घृण खून केल्याची अंगावर शहारे आणणारी घटना मेहकर येथील शिक्षक कॉलनी, प्रभाग क्रमांक १ मध्ये रविवारी रात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास घडली. या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण मेहकर शहर हादरून गेले असून, परिसरात भीती व हळहळ पसरली आहे.या घटनेत रूपाली राहुल म्हस्के (वय ३०) व तिचा चार वर्षीय मुलगा रियांश राहुल म्हस्के (वय ४) यांचा मृत्यू झाला आहे. आरोपी पतीचे नाव राहुल हरी म्हस्के (वय ३५) असे आहे. दरम्यान मेहकर पोलिसांनी आरोपी पतीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. राहुल म्हस्के, त्याची पत्नी रूपाली, मुलगा रियांश, वडील हरी गोविंद म्हस्के, आई ताराबाई हरी म्हस्के व आजी — असे एकूण सहा जण शिक्षक कॉलनीतील घरात वास्तव्यास होते. रविवारी रात्री सर्वजण गाढ झोपेत असताना, पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या राहुल म्हस्केने अचानक घरात ठेवलेली कुराड उचलली आणि झोपेत असलेल्या पत्नी रूपाली व मुलगा रियांश यांच्या डोक्यावर सपासप वार केले. घरातून येणाऱ्या हालचाली व आवाजामुळे राहुलची आई ताराबाई मस्के यांना संशय आला. त्यांनी बाहेर येताच घरातील भयावह दृश्य त्यांच्या नजरेस पडले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेली सून व नातवंड पाहून त्यांनी आरडाओरडा केला. घटनेची माहिती मिळताच घरासमोरील संजय समाधान कळसकर यांच्यासह इतर शेजाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. जखमी अवस्थेतील रूपाली यांना त्यांनी तत्काळ मेहकर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर तिची प्रकृती अत्यवस्थ असल्याने तिला छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी दाखल घटनेची माहिती मिळताच मेहकर उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवार, तसेच पोलीस अधिकारी संदीप बिराजे, अवचार, नरवाडे, खाडे हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सोमवारी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक लोढा यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलीसांनी आरोपी राहुल मस्के यास ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. घटनेमागील नेमके कारण, संशयाची पार्श्वभूमी व मानसिक स्थिती याबाबत चौकशी करण्यात येत आहे. चिमुकल्याचा मृत्यू पाहून शहर हळहळले चार वर्षांचा निष्पाप रियांश या कौटुंबिक वादाचा बळी ठरल्याने नागरिकांच्या भावना हेलावून गेल्या आहेत. वाद मिटवण्याऐवजी रक्त सांडले, अशी प्रतिक्रिया परिसरात उमटत असून, घरगुती संशय व मानसिक अस्थैर्य किती भयावह परिणाम घडवू शकते, याचे हे भीषण उदाहरण ठरले आहे.

## वीरपुत्र महाराणा प्रतापसिंह पब्लिक स्कूल ची शिवांगी बेकर्स प्रा. लि.खामगांवला शैक्षणिक भेट

खामगाव -दिनांक २६ डिसेंबर २०२५ पिंपरी गवळी फाट्यावर असलेल्या वीरपुत्र महाराणा प्रतापसिंह पब्लिक स्कूल ची शैक्षणिक सहल पारले-जी यूनिट शिवांगी बेकर्स प्रा.लि.ला गेली. या वेळी शिवांगी बेकर्सचे आशिष होनाळे सर यांनी संपूर्ण पारले बिस्किट चे उत्पादन कश्या पद्धतीने होते , बनवण्याची पद्धत, मोठ-मोठी यंत्रसामुग्री त्या उत्पादनसाठी लागणारे वातावरण , त्याची उत्पादन क्षमता , मुख्यत्वे पारले-जी बाबतची सविस्तर वीरपुत्र महाराणा प्रतापसिंह पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांना दिली.नित्य नावीन्य शोधणाऱ्या या कंपनीला भेट दिल्या मुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण क्षेत्रात आपण ही काही नवीन करून दाखवन्याची उमेद निर्माण झाली. या मधुन विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा व प्रेरणा निर्माण होऊन त्यांच्या आयुष्यात काही वेगळे करण्याची जिद्द निर्माण होऊ शकते.

# सोनेगाव येथे बिबट्याच्या हल्ल्यात एक गोरा फस्त तर तीन जख्मी

## परिसरात वाघाची दहशत कायम,शेतकरी भयभीत

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

पारशीवणी - पारशीवणी तालुक्यातील सोनेगाव येथे बिबट्याच्या हल्ल्यात एक गोरा फस्त तर दोन गोरे, एक कालवड जख्मी झाले. सविस्तर असे की, सोनेगाव येथील शेतकरी भारत इंगोले यांनी आपल्या पाळीव जनावरांसाठी शेतात गोठा बांधला आहे. दैनंदिन प्रमाणे २९ डिसेंबर २०२५ ला सायंकाळी आपल्या जनावरांना गोठ्यात बांधुन घरी निघाले. दुसऱ्या दिवशी ३० डिसेंबर ला सकाळी जनावरांची विल्हेवाट लावण्यासाठी शेतात गेले असता त्यांना एक गोरा आढळून आला नाही. व दोन गोरे, एक कालवड जख्मी अवस्थेत दिसुन आले. या घटनेची माहिती कळताच गावातील नागरिकांनी पाहण्यासाठी एकच गर्दी केली. याची माहिती वनविभागाला देण्यात आली. क्षेत्र सहाय्यक जे. पी. मेंढे, वनरक्षक शुभम बेले सह वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहचून पंचनामा करण्यात आला.

भारत इंगोले या शेतकऱ्याचे जवळपास एक लक्ष रुपयाचे नुकसान झाले असून सबंधित विभागाने नुकसाभरपाईची मागणी खरेदी विक्री संघाचे संचालक चंद्रभान इंगोले, विजय आमले, प्रदीप मेश्राम, रूपराव इंगोले, प्रभाकर ठाकरे,सूरज ठाकरे, दिलिप मेश्राम, पंकज आमले,रामकृष्ण इंगोले,घनश्याम आमले बाबा पाटील आमले, संदीप पाटील आमले, गंगाधर ठाकरे, स्वप्नील ठाकरे, रोशन ठाकरे, रुखसल गीऱ्हे सह समस्त गावकऱ्यांनी केली आहे



# 'चित्र' आणि 'चिडिया' या कथा मानवतेला आवाज देतात : प्रो. कुमुद शर्मा

## निवासी लेखिका डॉ. क्षमा कौल यांची 'चित्र' व विद्यार्थी खुशाल सिंह यांची 'चिडिया' कथांचे वाचन

**दिव्य वतन /प्रतिनिधी**




वर्धा : महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या 29 व्या स्थापनोत्सवानिमित्त सोमवार, 29 डिसेंबर रोजी ग़ालिब सभागृहात काश्मीरी व हिंदीतील प्रख्यात लेखिका तसेच विश्वविद्यालयाच्या निवासी लेखिका डॉ. क्षमा कौल यांची कथा 'चित्र' व हिंदी साहित्य विभागातील विद्यार्थी खुशाल सिंह यांची पुरस्कार प्राप्त कथा 'चिडिया' यांचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून संबोधित करतांना कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा म्हणाल्या की दोन्ही कथा मानवतेला आवाज देणाऱ्या आहेत. साहित्य केवळ समाजाचा आरसा नसून ते शक्यता दाखवते, अंधारात प्रकाश देत पुढील वाट दाखवते. डॉ. क्षमा कौल या एक परिपक्व कथाकार असून त्यांचे साहित्य अंतर्मुख करणारे आहे. 'चित्र' या कथेत विस्थापनाचे दुःख प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. खुशाल सिंह यांच्या 'चिडिया' या कथेबाबत बोलताना त्या म्हणाल्या की या कथेत वाचकांचे लक्ष वेधून घेण्याची ताकद आहे आणि ती उत्कंठा निर्माण करते. खुशाल सिंह यांच्यात एक चांगला कथाकार होण्याचे गुण आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात कुलगीत, सरस्वतीच्या प्रतिमेला माल्यार्पण आणि दीप प्रज्ज्वलन करुन झाली. कार्यक्रमाचे संचालन छात्र कल्याण अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार यांनी केले तर आभार कुलसचिव क़ादर नवाज़ ख़ान यांनी मानले. कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी लेखिका डॉ. क्षमा कौल यांचे विश्वविद्यालयाचे स्मृतिचिन्ह व सूत माळ देऊन स्वागत केले, तर परीक्षा नियंत्रक डॉ. सुरेंद्र गादेवार यांनी खुशाल सिंह यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. कार्यक्रमासाठी तांत्रिक सहकार्य सचिन बोळखे यांनी केले तर यशस्वी आयोजनासाठी कर्मचारी रामप्रवेश आणि अश्विन श्रीवास यांनी सहकार्य केले. या वेळी हिंदी साहित्य विभागाचे सहायक प्रोफेसर डॉ. कोमल कुमार परदेसी, जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि शोधार्थी उपस्थित होते.

# पुलांच्या बांधकामात घोळ?

**दिव्य वतन /लीलाधर दवंडे**

वर्धा जिल्ह्यातील कारंजा ( घाडगे ) शहरातील अगदी बस थांब्यापुढून जाणाऱ्या नागपूर अमरावती महामार्गावर बांधण्यात आलेल्या पुलाचे उद्घाटन होऊन कदाचित वर्षपूर्ती सुद्धा झाली नसावी आणि काल परवाच्या वृत्तपत्रांत पुलाच्या वरच्या भागात भेगा पडल्याचे वृत्त प्रकाशित झाले. कदाचित त्यातून काही तुकडे पडून कुणी जखमी होऊ नये यासाठी स्थानिक प्रशासनाने दक्षता घेतली आहे, ही बाब निराळी. मात्र, बांधून वर्ष सुद्धा झाले नाही, अशा पुलांची ही परिस्थिती बघून बांधकामात कुठली अनियमितता तर नाही ना? कुठला भ्रष्टाचार तर मुरत नसावा ना? असे प्रश्न सर्व सामान्य नागरिकांना पडायला लागले आहेत. आणि असे प्रश्न पडून संताप व्यक्त करणे साहजिकच आहे. कारण, जनतेचा कर रूपात गोळा केलेला पैसा या अशा कामात खर्च केला जातो आणि तेच काम असे ढिसाळ असेल किंवा नित्कृष्ट दर्जाचे असेल तर कुणीही संताप व्यक्त करणारच!

गेल्या काही वर्षांचा आढावा घेतो म्हटले तर महाराष्ट्रात आणि देशात कितीतरी नव्या पुलांची उभारणी करण्यात आली. अजूनही सुरूच आहे. वाढती लोकसंख्या. वाढती वाहने यामुळे दळणवळणासाठी रस्ते अपुरे पडू लागल्याने अशा पुलांची गरज कुणीही नाकारू शकत नाही. मात्र, कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात येणारे हे पूल जर एक वर्षही व्यवस्थित तग धरू शकत नाही तर कुठेतरी पाणी मुरते आहे, असे वाटायला नाही लागणार तर काय? बरं! पुलांना भेगा कशामुळे जातात, असा प्रश्न जर एखाद्या पत्रकाराने किंवा जागरूक नागरिकाने केला तर अनेकदा उत्तर मिळतं," क्षमतेपेक्षा अधिक जड वजनाची वाहने गेल्याने पुलांस भेगा पडल्या. रस्ता उखडला. कठडे तुटले" अशी सुसंगत न वाटणारी कारणे दिल्या जाते. अशी कारणं ऐकली की हसावं की रडावं हेच कळत नाही.

आज दळणवळण वाढलं आहे, यात दुमत नाही. अती जड वाहनांसाठी बायपास मार्ग बनविले. समृद्धी सारखे जलदगती महामार्ग बनविले. तरीसुद्धा ही अती जड वाहतूक पुलांवरून होत असेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई व्हायला नको का? आणि वाहन चालकांनी तरी क्षमतेपेक्षा जास्त जड वाहने या पुलांवरून कशाला घेऊन जायची? त्यांच्या अशा वागण्याचा मनःस्ताप इतरांना सहन करावा लागतो ना! बरं, आज शहराच्या कित्येक चौकाचौकांत वाहतूक पोलिस उभे असतात. बहुदा सिग्नल सोडून आडोश्याला उभे राहत असल्याचे चित्र दिसेल. सिग्नल सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर सोडून हे मोकळे. कारणं काय असावी, हे तेच जाणोत. शहरातून पुलांवर चढणारी ही वाहने त्यांना दिसत नसावीत काय? हजारो टन लोखंड किंवा इतर सामान घेऊन वाहतूक करणारे ट्रक सोडून काही वाहतूक पोलिस, कंपनी कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या बसेसना अडवतात. त्यावेळी खरेच त्यांची कीव यायला लागते. आता नुकतेच जेव्हा वाहतुकीची कोंडी होऊन जनतेचा आक्रोश वाढायला लागला तेव्हा २० हजार ९०० जड वाहनांवर कारवाई करत ३०० खासगी बस चालकांवर गुन्हे दाखल केले म्हणे. यू टर्न नावाने हे विशेष अभियान चालविण्यात आले होते. यात २० ट्रॅव्हल्सचे परवाने सुद्धा रद्द केलेत म्हणे.

मागे, देशातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत असणाऱ्या बुटीबोरी येथील पूल कुठल्यातरी जड वाहनाने जरासा खाली दबला आणि कितीतरी महिने या महामार्गावरून जाणारी वाहतूक खोळंबत राहिली. त्यावरून जाणारे वाहन अती जड असल्याने ही दुर्घटना घडली होती. पण, असे अती जड वाहने जाऊच कशाला द्यायचे? वाहतूक नियंत्रण यंत्रणा काय फक्त हेल्मेट न घातलेल्या दुचाकी चालकांच्या फोटोच काढायच्या कामाचे आहेत काय? नागपूर जिल्ह्यातील कन्हान नदीवर नुकतेच बांधलेल्या पुलावरचा रस्ता तर असा काही उखडून गेला आहे की, त्यास पाहून हा रस्ता किती जुना असावा असा वाटून जाते. अगदी दिवसा ढवळ्या जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकावी असला प्रकार सुरू असूनही रस्ते तसेच पुलांच्या बांधकामातील भ्रष्टाचारावर जनतेने मूग गिळून गप्प बसावे म्हणजे कमालच आहे.

एकीकडे दीडशे वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी उभारलेला कन्हान नदीवरील पूल अजूनही उभा आहे ( गेल्यावर्षी वाहतुकीसाठी बंद करण्यात आला) आणि दुसरीकडे काल परवा बनविलेल्या पुलांना भगदाड पडून जनतेत असुरक्षितता निर्माण व्हावी यात भ्रष्टाचार मुरतो आहे, असे वाटणार नाही तर काय?गेल्या वर्ष दोन वर्षांत बिहार राज्यात एका पाठोपाठ कितीतरी पुल कोसळून देशाची वित्तहानी झाली होती. तिथे जून जुलै २०२४ मध्ये तर अवघ्या १३ दिवसांत १० पूल कोसळले होते. तरी, बिहार मध्ये त्यावेळचे ग्रामीण व्यवहार मंत्री अशोक चौधरी यांनी राज्यात एक हजार नवे पूल उभारण्याची घोषणा केली होती. नवे पूल उभारणे गरजेचे आहे. ते नक्कीच उभारायला हवे. पण, त्यात जनतेच्या कष्टाचा पैसा असतो, याचे भान असावे. पुलाचे बांधकाम नित्कृष्ट दर्जाचे नसावे. शिवाय जड वाहने सहन करू शकतील, अशी त्याची क्षमता असावी. नुसत्या दुचाकींसाठी पूल उभारून काय फायदा? वास्तविक शहरातील वाहतूक जड वाहनांमुळे खोळंबते. शिवाय जड वाहने लांब पल्ल्याची असतात. तेव्हा त्यांना पुलावरून जाता येईल, असे पूल हवेत. दहा पूल बांधण्यापेक्षा पाच बांधा ना! पण, त्याची सहन क्षमता अधिक असावी. न की काहीच दिवसांत त्यांना भेगा पडायला लागतील.

एका वृत्तपत्राच्या चेअरमनने तर चक्क आरोप लावला होता. की, लोकप्रतिनिधींचा आशीर्वाद असल्याशिवाय कुठलाही अधिकारी चुकीचे काम करू शकणार नाही. त्यामुळे दोष कुणाला द्यावा, ही बाब उघडपणे मांडावी अशीही नाही. इतकेच नाही, तर त्यांनी नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोचे आकडे देत सांगितले की, गेल्या दहा अकरा वर्षांत देशात २५० पेक्षा जास्त आणि गेल्या ४० वर्षांत २००० पेक्षा जास्त पूल कोसळले आहेत. विकास करायचा तर बांधकाम करावेच लागेल आणि इतक्या बांधकामात एखादे बांधकाम नित्कृष्ट असले तर बिघडते कुठे? असा प्रसार करणाऱ्या महाभागांनी या कोसळणाऱ्या पुलांचा आकडा नक्कीच बघावा. कदाचित याच भीतीने नागपुरातील सीताबर्डी पुलावरून जड वाहनांना बंदी घालण्यात आली नसावी ना! असा संशय प्रवाश्यांच्या मनात निर्माण न झाला तर नवलच!

अररिया जिल्ह्यात तर बकरा नदीवर बांधण्यात आलेला पूल उद्घाटनाच्या आधीच कोसळला होता. नदीवर बांधण्यात आलेल्या पुलांच्या खांबाच्या खालची वाळू नेण्यास मज्जाव घालण्यात यावा. मात्र, चोरट्या मार्गाने नेणारी वाळू पूल ढासळण्यास कारणीभूत ठरू शकतात.गेल्या काळात शिरतो म्हटले तर गुजरातमध्ये मोरवीत सस्पेन्सन ब्रीज कोसळून झालेल्या दुर्घटनेत १४१ जणांचा मृत्यू झाला होता. बिहारच्या खगरीयात १७१७ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेला पूल कोसळला होता. मध्यंतरी मोठा गाजावाजा करून मुंबईत बांधण्यात आलेल्या अटल सेतूलाही भेगा पडल्याचे वृत्त कानावर आले होते.

जर असेच धडाधड पूल कोसळत असेल तर त्याची गुणवत्ता तपासण्याचे काम कुणाचे? त्या पुलावर किती खर्च आला आणि प्रत्यक्षात त्याचे बांधकाम साहित्य पकडून ऑडिट केले तर किती खर्च करण्यात आला याचा लेखाजोखा कुणी प्रामाणिक करतो काय? अशा प्रश्नांची जनतेच्या मनात गर्दी व्हायला लागली आहे. तेव्हा, देश विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले पूल नक्कीच बांधा. पण, त्याचे बांधकाम नित्कृष्ट दर्जाचे नसावे. जर कुणी असे करत असेल तर ज्याप्रमाणे ब्रिटिश करारनामा लिहून घ्यायचे, त्याप्रमाणे करारनामा लिहून घ्यायला हवा आणि पुलांना भेगा पडल्या, पूल कोसळला तर बांधकाम कंपनीवर,अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. जोपर्यंत कठोर कारवाई करण्यात येणार नाही. तोवर देशास भ्रष्टाचार असाच पोखरत राहील, यात दुमत नाही.

## नववर्ष आनंदाच्या अवकाशातील भरारी नि पाचविला पुजलेली गरिबी

नववर्षाच्या पूर्वसंध्येला जवळजवळ प्रत्येकच घरातले दिवे मध्यरात्रीपर्यंत सुरू असते. त्यामुळे देश रात्रीसुध्दा जागा असतो असं म्हणायला हरकत नाही. सरत्या वर्षाला निरोप देत असताना कटू-गोड आठवणींची सोबत असते. हे वर्ष खूप काही देऊन आणि शिकवून जाते. त्यामुळे हे सरतं वर्ष अनेक प्रकारे प्रेरणादायी आणि आश्चर्यकारक ठरते. याच आश्चर्यामुळे सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केल्या जातं. हा सोहळा जेवढा नेत्रदीपक असतो, तेवढाच मनाला सुखावणारा आणि नवी उमेद देणारा ठरतो. पण... ज्याप्रमाणे कोणतीही व्यक्ती जडभरीत वस्त्रांनी आणि वेगवेगळ्या सौंदर्य प्रसाधनांनी नटून-थटून चारचौघात गेल्यावर त्याला कुणीही नवं तर म्हणणार नाही ना! एवढच का जोपर्यंत त्याच्या शरीरावर जडभरीत वस्त्र व प्रसाधनं असते, तोपर्यंत तो थोडा वेगळा वाटतो. ते सर्व उतरल्यावर 'जुनं ते सोनंच' असते. अगदी त्याचप्रमाणे आयुष्यात येणारा प्रत्येक दिवस हा सारखा नसतो. असं असलं तरीही प्रत्येक दिवसात काहीतरी 'नवं' असतंच असं नाही. पण एक मात्र निश्चित त्यात 'वेगळं' काहीतरी नक्कीच असतं. आणि या वेगळेपणामुळेच उगवणारा प्रत्येक दिवस आपल्याला नवा वाटत असतो. याच वेगळेपणाचे नाविन्य ओळखले तर प्रत्येक दिवस हा नववर्षाची 'सुरुवात' ठरू शकतो. सूर्याच्या प्रत्येक किरणाला सप्तरंग असते. ज्याला आपण 'इंद्रधनुष्य' या नावाने ओळखत असतो. या सात रंगापैकीच एक रंग स्मृतीचा असतो आणि हा स्मृतीचा रंग ज्या क्षणाला सर्वांगाने स्पर्शून जातो, तो क्षण अविस्मरणीय ठरतो. पण या रंगालाही वेगवेगळ्या छटा असतात. कधी सुखाची तर कधी दु:खाची, कधी यशाची तर कधी अपयशाची, कधी कॅन्सरची तर कधी कोरोनासारख्या व्हायरसची. पण काहीही असो, अशा क्षणामुळेच पूर्ण वर्ष अविस्मरणीय ठरत असते. म्हणूनच नववर्षाचं स्वागत करताना पाठमो-या वर्षाला विसरावं असं वाटत नाही.

ऊन पावसाचा मिलाफ होता इंद्रधनुष्य नभी दिसतो
सुख दु:खाचे सप्तरंग अवतरतानियतीचा खेळ कळतो

नवीन वर्ष म्हणजे विविध संकल्पाचा मुहूर्ताचा क्षण! भूतकाळाच्या अंधारात हरवलेल्या क्षणांच्या गर्तेतून आलेली जीवनाची 'नाव' उज्ज्वल भविष्यातील स्वप्नांच्या यशाच्या किनारी लावण्याची नवी उमेद देणारा क्षण...पण स्वप्न कितीही आपुलकीनं रंगविली तरीही ते कधीच आपली होत नसतात. मानवी जीवनाची अस्थिरता आणि स्वप्नांची क्षणभंगुरता यांचं नातं कासवाच्या कवचासारखं घट्ट विणलेलं. हा त्यांचा संबंध नववर्षाच्या पहिल्या दिवशी जाणवतच नाही. पण जुनं होणा-या वर्षाकडे पाहिलं की, हे खरं वाटायला लागतं. म्हणून मग नववर्षाचं स्वप्न रंगविणे म्हणजे तळहातावरच्या आयुष्य रेषेची लांबी मोजण्यासारखं आहे. मानवी कल्पक बुद्धीचा विचार करता...

ईश्वर साक्षी नवीन वर्षी करीन प्रयत्न नव्या दमाने
संकल्पांच्या पुण्यतिथीला संकल्पाचे स्मरण नव्याने

सुरू होणारं नववर्ष एक वर्षानंतर जुनं होणारं असतं. पण तरीही नववर्षाचा पहिला दिवस आपल्या आयुष्यात वेगळच महत्त्व घेऊन येतो. या दिवशी उगवणारा सूर्य तोच असला तरी नववर्षाच्या 'सुखाची भूपाळी' गात येतो. त्यामुळे त्याच्या चेह-यावर एक 'पाहुणपण' जाणवतं आणि म्हणूनच अशा पाहुण्याचं स्वागत करण्याची अदम्य इच्छाशक्ती प्रत्येकाच्या चेह-यावर स्पष्टपणे जाणवते.

इंचभराने फुगली नाही यगायुगांची खोगिरभरती
सूर्य कारकुन रोज सारखी सही ठोकतो मस्टर वरती

नववर्षाच्या पूर्वसंध्येला मावळतीकडे निघालेल्या सूर्याला निरोप देताना मनाला लागलेली भावस्पर्शी हुरहुर तर दुसरीकडे गुलाबी बोच-या थंडीत कुडकुडत का होई ना थर्टीफर्स्ट साजरा करण्यासाठी चाललेली लगबग यामुळे निरोप आणि स्वागताचा हा एक आनंददायी 'सोहळा' होत असतो. मावळतीच्या वर्षात केसर रंगात अर्घ्यस्नान करून सूर्य मोतीजडीत लाल जडभरीत प्रकाशमय वस्त्र परिधान करण्यासाठी क्षीतिजाआड गळप होतांना गलबलून आलेलं हळवं मन कृत्रिम रोषणाईच्या आरासीत, फटाक्यांच्या आतषबाजीत विचारांना नाविन्याचा मुलामा चढवून नव्या वर्षात समरस व्हायला लागतं. संगिताच्या मधूर स्वरात अन् ढोलताशांच्या निनादात नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सर्वजन सज्ज असते.

'सुखमय वैभवाच्या पानाफुलांनी बहरत यावे नववर्ष
अमृतमय आनंद फळांनीबहरावा जीवनवृक्ष'

यासारख्या लक्षवेधी शब्दांच्या संगतीनं मनही हरखून जातं. येणारी आव्हानं नव्या उमेदीनं पेलण्यासाठी हे नववर्ष प्रत्येकाला खुणावत असतं आणि प्रत्येकजन हे आव्हान पेलण्यासाठी आपआपल्या परीने तयार होत असतो आणि प्रत्येकाला सांगत असतो...

गेले दिवस विसरूनिया करा स्वागत नववर्षाचे
पाऊल उचला न डगमगतानव कल्पीत आशेचे

पण जरा वैचारिक दृष्टीकोनातून हा नववर्षाच्या स्वागताचा चाललेला फापटपसारा सत्कामी लावला, तर कित्येक हतबल जीवनात सप्तरंग फुलवता येईल. आजच्या धकाधकीच्या जीवनात कुणी कुणाला मदत करत नाही. त्यामुळे कुणाकडूनही कोणत्याही गोष्टीची अपेक्षाही करता येत नाही. पण असं कोणतच कार्य नाही की, ज्या कार्यासाठी कुणाचीही मदत घ्यावी लागणार नाही. माणूस कसाही असो, तो कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असो, त्याला कुणाची ना कुणाची मदत घ्यावीच लागते. यासाठी प्रत्येकाने प्रत्येकाला आपआपल्या परीने मदत करायला हवी. पण मदतकर्त्याने पुढच्या व्यक्तीकडून कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करू नये. त्याला आपल्याच परिवारातील एक सदस्य समजायला हवे. पण हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा त्याला भावनेची जाण असते. परंतु वास्तविक जीवनात असं खूपच कमी पहायला मिळते आणि हे शाश्वत सत्य आहे की, आपल्याकडून सहसा असं घडत नाही, घडलं तरी ते अवचितच. विशेष करून अनुभवात्मक दृष्टीकोनातून पाहल्यास परक्याकडूनच जास्त असं काही घडत असते. कारण या जीवनात सर्वप्रथम माणसाला माणसं ओळखण्याची कला अवगत करावी लागते. पण सद्यस्थितीत ती आपल्याजवळ नाही.

# सावधान!सोशल मीडियाचा वाढता वापर धोकादायक स्थितीत

आजच्या परिस्थितीत सोशल मीडिया किंवा मोबाईल मानवी शरीरावर स्लोपॉयझनचे काम करीत असुन घणाघाती प्रहार करीत आहे व संपूर्ण दिनचर्येवर अंकुश लावत आहे.आज लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्रास सोशल मीडियाचा वाजवीपेक्षा जास्त वापर होतांना दिसत आहे. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावण्याचे मोबाईलसह सोशल मीडिया करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.जिथे गरज नाही तीथेही सोशल मीडियाचा वापर दिसून येतो. आज फक्त ऑस्ट्रेलिया, स्वीडनमध्येच नाही तर संपूर्ण जगात टिव्ही आणि मोबाईलच्या अती वापरामुळे म्हणजेच सोशल मीडियामुळे दुष्परिणामाला सुरूवात झाली आहे.कारण टीव्ही आणि मोबाइलने लहान मुलांसह संपूर्ण मानवजातीला कौटुंबिक नाते तोडून आपलेसे करून ठेवले आहेत. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावले आहे.टिव्हि आणि मोबाइलचा दुष्परिणाम लहान मुलांवर मोठ्या प्रमाणात होऊन पुढील आयुष्यासाठी धोका निर्माण करण्याचे चिन्ह स्पष्ट दिसत आहे. कारण यामुळे अनेक नवीन -नवीन आजार जन्म घेऊ शकतात आणि घेत आहे.आधुनिक काळात लहान मुले रडायला लागली की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला जातो आणि ही प्रथा जगातील अनेक देशांमध्ये आहे.याचा दुष्परिणाम स्वीडनमध्ये व ऑस्ट्रेलियामध्ये दिसायला लागला आहे. त्यामुळे आता स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.तर ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात आली आहे.एका पाहणीनुसार १३ ते १६ वयोगटातील स्वीडिश किशोरवयीन मुले शाळेबाहेर पडल्यानंतर दररोज सरासरी साडेसहा तास मोबाइल, टीव्हीवर घालवत आहेत.८ तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनवर अमेरिकेतील किशोरवयीन मुले घालवत आहेत. हीबाब भविष्यासाठी अत्यंत घातक आहे.देशांच्या आरोग्य संस्थेच्या मते मोबाईल आणि टिव्ही स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करीत असल्याने लहान मुलांना डिजिटल मिडिया आणि टेलिव्हिजन पासुन पूर्णपणे दुर ठेवले पाहिजे. मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे कौटुंबिक संवाद आणि शारीरिक व्यायाम बंद झाले आहे. आपण म्हणतो "बालपण देगा देवा!"परंतु आज आपले बालपण मोबाईल आणि टिव्हीने हिरावून घेतले आहे ही अत्यंत चिंताजनक आणि घातक बाब आहे.स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये व ऑनलाईन शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.याचेच प्रायश्चित्त आज स्वीडिश व ऑस्ट्रेलियन किशोरवयीन मुले भोगत आहेत. ही परिस्थिती फक्त स्वीडनमध्ये किंवा ऑस्ट्रेलियामध्येच नाही तर भारतासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने सुध्दा दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही. कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटोनघंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या व टिव्हीच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल ॲक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी-कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल ॲक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारिरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारिरिक दृष्ट्या खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४५ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारिरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून ॲक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा अती वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक) होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा ॲटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन ॲटॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मेंदूचा त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील प्रत्येक अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही. त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे.मानवाला मोबाईलमुळे व टिव्हीमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका आणि गंभीर परिणाम मोबाईल व टिव्हीच्या स्क्रीनमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे.त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा."अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो. आज आपण पहातो की ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो. छोटे मुलं रडायला लागले की आई- वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल ॲक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजार पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले आहे किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना आज करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी सोशल मीडियामुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल व सोशल मीडियाचे युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते "कहा गये ओ दिन"स्वीडन ऑस्ट्रेलियामध्ये मोबाईल आणि टिव्हीचे लहान मुलांवर होत असलेले दुष्परिणाम पहाता स्वीडन सरकारने काही मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. यावरून स्पष्ट होते की टीव्ही आणि मोबाइलने स्वीडनमध्ये भयावह रूप धारण केले आहे.त्यामुळे यापासून भारत सरकारने व देशातील संपूर्ण जनतेनी सावधगिरी बाळगली पाहिजे.ऑनलाइन बाल लैंगिक शोषणाशी संबंधित साहित्य असणारे यूआरएल अद्यापही सक्रिय आहेत हे रोखण्यासाठी सरकारने कठोर पाऊले उचलुन तातडीने नियंत्रण आणणे गरजेचे आहे. भारतात वाढता सोशल मीडियाचा वापर पहाता सरकारने ऑस्ट्रेलिया व स्वीडन सारखे कठोर नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.



# श्री. रामदास समर्थ रचित "सवाया"

"तुझा भाट मी वर्णीतो रामराया..
सदा सर्वदा गाय ब्रीदे सवाया...
महाराज दे अंगीचे वस्त्र आता.,
बहु जीर्ण झाली देह बुद्धि कंथा"....

प्रथम सर्वांनाच प्रश्न पडतो की सवाई याचे अनेक वचन सवाया म्हणजे काय?.. खरंच हा लेखन प्रकार बहुतांश लोकांना परिचित नाही. मधल्या काळातील लोकांना थोडाफार माहीती होता. त्यांच्या कानावर कधीतरी पडलेला हा प्रकार होता. परंतु आज लोकांना याबद्दल अजिबातच कल्पना नाही. या सवाया म्हणजे काय? हे जाणून घेण्यासाठी स्थूल व सूक्ष्म स्वरूपाचा सखोल असा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. श्री. समर्थ रामदास स्वामींनी सज्जनगडावर सवाया म्हणण्याची सुरुवात केली. पहिले गडावर करुणाष्टके वगैरे सामुदायिक म्हंटली जात होती. परंतु सवाई हा प्रकार सामुदायिक म्हणण्याचा नाही. सवाई ही व्यक्तिगत म्हंटली जाते. सवायीच्या पदातील पहिले चरण हे दोनदा म्हणण्याची पद्धत आहे .पूर्ण पद म्हणून झाल्यावर 'म्हणावा जय जय राम'.. 'म्हणावा जय जय राम'... असे दोनदा म्हणावे लागते. या अशा पद्धतीने म्हंटलेल्या सवाया ह्या खोल मनाला जाऊन भिडतात.

श्री समर्थांचे वांग्मय हे अगदी उत्तम दर्जाचे आहे. त्यांचे दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, आरत्या सवाया हे अत्यंत दुर्मिळ असे प्रतिभा संपन्न साहित्य आहे. त्यांच्या या साहित्यातून सर्वांनाच जीवनोपदेश मिळतो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत त्यांचे साहित्य हे उपयुक्त ठरणारे आहे. त्यांचं हे वाङ्मय जुन्या काळातील असले तरी या काळात ते फार उपयुक्त ठरले आहे.समर्थांच्या साहित्यातून आर्थिक, सामाजिक व राजकीय असे मार्गदर्शन होते. म्हणून शिवाजी राजांसारख्या बलाढ्य व शूर राजाचे ते गुरु होते. शिवाजी महाराजांना त्यांच्या राजकारणात समर्थांची भक्कम साथ होती. समर्थांसारखे सामर्थ्यवान गुरु शिवाजी महाराजांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याने ते अजिंक्य राजे होते. त्यामुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्याचे रक्षण करणे सहज शक्य झाले होते .

'सवाया'हा मधल्या काळात लुप्त झालेला प्रकार आहे. पूर्वी राजाची स्तुती करण्यासाठी भाट असत. ते राजाचे वर्णन सुंदर शब्दात करत असत. त्यांनाच मराठीत स्तुती पाठक असेही म्हंटले जात असे. कारण ते जे राजाचे वर्णन करत असत ते काव्यप्रकारात करत असत व राजाची स्तुती ही मोठ्या खणखणीत आवाजात केली जायची. म्हणजेच त्या भाटाच्या आवाजाने दरबार दुमदुमून जायचा व राजा ही खुष व्हायचा. अशी ही सवाईची जादू आहे. समर्थांनी रामराय, गणेश, हनुमंत इ. देवांच्या सवया रचल्या आहेत. याचबरोबर त्यांनी वारांच्या पण सवाया केल्या आहेत. उदा. सोमवारची शंकराची सवायी, मंगळवारला देवीची सवायी, बुधवारला विठ्ठलाची सवायी तसेच गुरुवार ,शुक्रवार, शनिवार व रविवारची सवायी अशा अनेक सवाया केल्या व त्या आजतागायत म्हंटल्या जातात. हे एक पूर्ण सत्य आहे.

तुझा भाट मी वर्णितो रामराया
| सदा सर्वदा गाय ब्रीदे सवाया |

या सवाईतून समर्थांनी खूप सुंदर उपदेश लोकांना दिला आहे. समर्थ म्हणतात की, रामराया मी तुझा भाट आहे. रामराया मी तुझे गुणवर्णन लोकांना सांगतो आहे. यातून समर्थांना हेच सुचित करायचे आहे की, रामाबद्दल लोकांमध्ये आदर व प्रेम निर्माण झाला पाहिजे. राम हे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व आहे. ते मर्यादा पुरुषोत्तम म्हणून जगप्रसिद्ध आहेत. समर्थ सांगतात की, प्रत्येकानेच राम नामात डुंबून त्याचा आनंद घ्यावा. राम भक्ती श्रवण करून देहाच्या पलीकडे जाऊन भावावस्थेमध्ये प्रत्येकाने आपले जीवन व्यतीत करावे. ज्यांना हे रामभक्तीचे मर्म कळले किंवा ज्यांना हे साधले त्यांची या जीवनमृत्यूच्या चक्रातून निश्चितच सुटका होते.म्हणजेच 'पुनरपी जननम व पुनरपी मरणम' याप्रमाणेच पुन्हा जन्माला येण्यातून सुटकाच होते. म्हणजेच जन्माला येण्या जाण्याच्या त्रासातून सुटका होते.जन्माला येण्या जाण्याचा त्रास संपून जातो .खरे तर यालाच मुक्ती असेही म्हणतात. दत्तप्रभू आपल्या भक्ताला ८४ लक्ष योनीच्या फेऱ्यातून मुक्त करतात हे सुद्धा समर्थांनी आपल्या सवयांमधून सांगितले आहे.समर्थ म्हणतात की,

"महाराज दे अंगीचे वस्त्र आता |
बहुजीर्ण झाली देह बुद्धी कंथा ||

श्रीरामाचं स्मरण ठेवलं की देहाचं आपल्याला विस्मरण होतं. राम नामामुळे मनुष्य प्राणी हा जीवनरूपी भवसागरातून तरुन जातो. समर्थ म्हणतात की, आपलं जे शरीररुपी वस्त्र आहे ते काम, क्रोध, मद, मोह ,लोभ या गुणांनी मलीन झालं आहे. आज मनुष्य अनेक गोष्टींच्या आहारी गेला आहे. त्याचा क्रोधावर ताबा राहिला नाही. त्यामुळे तो स्वत:चेच नुकसान करून बसतो. म्हणूनच या प्रपंच रुपी मोहमायेतून सुटका होण्यासाठी एकच मार्ग आहे. तो म्हणजे ईश्वर भक्ती होय. त्यातही कलियुगामध्ये नामाला खूप महत्त्व आहे. रामाचे एकदा नाम उच्चारल्याने सात जन्माचे पातक नाहीसे होते असे म्हणतात. याच राम नामामुळेच तर वाल्याचा वाल्मिकी झाला हे आपल्या सर्वांना माहितीच आहे. म्हणूनच समर्थ म्हणतात की, श्रीरामाला स्मरून वाईट गोष्टींचे विस्मरण केले पाहिजे. आपला पापाने बरबटलेला हा देह वाईट गोष्टींनी व वाईट बुद्धीने जीर्ण झाला आहे. तेंव्हा हे देहाचे वाईट कृतींनी जीर्ण झालेले वस्त्र बदलून आपण ईश्वर भक्ती रुपी रामनामाचे नवीन वस्त्र परिधान करावे. म्हणजेच श्रीरामाचे स्मरण केल्याने देहाचे विस्मरण होऊन आपण राममय होऊ शकतो. तसेच श्रीरामाच्या जय जयकाराने जीवनात खऱ्या अर्थाने ज्ञानरूपी राम हा प्रगट होतो व त्यामुळे आपल्याला मोक्ष मिळू शकतो. खरे तर मोक्ष हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असते आणि रामरायामुळेच हे ध्येय साध्य होऊ शकते. कोणालाही ही गोष्ट साधता येत नाही.

# इतिहासाचार्य वि.का.राजवाडे: 'महिकावतीची बखर'कार ?

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे मराठी इतिहास संशोधक होते. त्यांनी संपादित केलेले मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचे २२ खंड हे मराठा साम्राज्य इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वाचे साधन मानले जाते. सविस्तर माहिती श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींच्या लेखातून...

सन १८९८ साली त्यांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. दि. ७ जुलै १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना त्यांच्या पुढाकाराने झाली. राजवाडे म्हणायचे- ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्य लोक शिकतील; माझ्या ग्रंथांची पूजा करतील. मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीर्तीला हपापलेला नाही.

वि.का.राजवाडे यांचा जन्म महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील वरसई येथे दि.२४ जून १८६३ रोजी झाला. बीएपर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर करून ते प्रकाशात आणण्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक सुरू केले. त्यांच्या जन्माच्या वर्षाबाबत थोडा गोंधळ झालेला दिसतो. त्यांच्याविषयीच्या विविध लेखनांत त्यांचे जन्मवर्ष वेगवेगळे दिलेले आढळते. राजवाडे यांच्या मृत्यूनंतर द.वा. पोतदार यांनी केसरीत लिहिलेल्या लेखात त्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८६ अशी नोंदवलेली आढळते. यानुसार इ.स.१२ जुलै १८६४ हा दिनांक मिळतो. मात्र त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रकाशित झालेल्या ब्राह्मण-पत्रिकेच्या राजवाडे तिलांजली अंकात वा.दा.मुंडले यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे, त्यानुसार राजवाडे यांनी मुंडल्यांना आपला जन्मशक १७८५ असा सांगितला होता. त्याबाबत मुंडले यांनी पोतदारांकडे विचारणा केली आणि राजवाड्यांचे थोरले बंधू वैजनाथपंतांकडे विचारणा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे विचारणा केली असता राजवाडे यांची एक जन्मपत्रिका वैजनाथपंतांनी पोतदारांना उपलब्ध करून दिली. ती मुंडलेंच्या लेखात छापली असून त्यावर राजवाड्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८५ अशी नोंदवलेली आहे. इसवी सनानुसार हा दिनांक २४ जून १८६३ असा आहे. दत्तोपंत पोतदार यांनीही नंतरच्या काळात याच तिथीचा उल्लेख केलेला आढळतो. याव्यतिरिक्त दि.१२ जुलै १८६३ आणि दि.२४ जुलै १८६३ असे दोन दिनांक राजवाडे त्यांच्या जन्मतारखा म्हणून नोंदवलेल्या आढळतात. मात्र त्यांचे आधार नोंदवलेले आढळत नाहीत. त्यामुळे उपलब्ध पुरावे पाहता आषाढ शु.८ शके १७८५ अर्थात दि.२४ जून १८६३ हाच त्यांचा खरा जन्मदिनांक असावा, असे म्हणता येते.

राजवाडे यांच्या नावावर स्वतंत्र असा एकही ग्रंथ नाही. त्यांनी नियतकालिकांमधून किरकोळ स्वरूपाचे लेख लिहिले. महिकावतीची बखर आणि राधामाधव विलास चंपू या प्राचीन ग्रंथांचे संपादन केले. मुख्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती तब्बल बावीस खंडांमध्ये छापली. त्यांच्यापैकी काही खंडांना प्रस्तावना लिहिल्या. ते संपादनांपेक्षा अधिक गाजले ते या प्रस्तावनांमुळे. ज्यांना या प्रस्तावना आवडल्या नाहीत, त्यांनाही त्यांनी अविश्रांत कष्ट घेऊन ऋणी केले. प्रचंड भ्रमंती करून जमा केलेल्या इतिहासाच्या साधनसामग्रीसाठी त्यांच्या ऋणात राहण्यावाचून पर्यायच नव्हता. त्यांनी लिहिलेली राधामाधव विलास चंपू या प्राचीन ग्रंथांचे संपादन त्यांनी केले. असेच त्यांच्या बहुतेक पुस्तकांबद्दल म्हणता येईल.

महाराष्ट्राच्या विचारविश्वात इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांचा मोठा दरारा, दबदबा आणि धाक होता. ते आपल्या हयातीतच एक आख्यायिका बनून गेले होते. त्यांच्यावर भरपूर टीका झाली. त्यांच्या हयातीतच प्रबोधनकार के.सी.ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, जिवाजी मंगेश तेलंग यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले होते. नंतरही इतिहास संशोधक त्र्यं. शं.शेजवलकर यांनी राजवाडेंच्या मर्यादा स्पष्ट केल्या. तथापि या सर्व गोष्टी एकत्र केल्या तरी त्यांचे वाक्य न् वाक्य ब्रह्मवाक्य मानणारा एक वर्ग अस्तित्वात होता. विशेष म्हणजे मराठी विचारविश्वात याच वर्गाचे वर्चस्व असल्यामुळे त्यांचे स्थान अबाधित राहिले.

इतिहासकार राजवाडे हे बुद्धिमान तर होतेच; पण त्यांना प्रतिभाशक्तीचीही देणगी लाभली होती. जबरदस्त आत्मविश्वास हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यामुळे साधा अंदाज किंवा कयाससुद्धा ते अशा पद्धतीने व अशा आक्रमकपणाने मांडत, की जणू काही तो त्रिकालाबाधित सत्य असलेला महासिद्धान्तच आहे. मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यायचे म्हटले म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखवला पाहिजे. काल, स्थल व व्यक्ती या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग वा ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देता येते. अंतिम चित्रण, इतिहासलेखन, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती, व्याकरण अशा अनेक विषयांवर मूलभूत संशोधन करणारे आणि मराठी भाषेतून लेखन करणारे इतिहासकार म्हणून राजवाडे परिचित आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची साधने असे शीर्षक असणारे २२ खंड त्यांनी संपादित केले. त्यांच्या मते इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय. केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती नव्हेत, असे त्यांचे मत होते. अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. अशा या थोर इतिहासाचार्यांचे दि.३१ डिसेंबर १९२६ रोजी निधन झाले.


!! राजवाडेंच्या अचाट अविस्मरणीय स्मृतींना विनम्र अभिवादन !!

श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
द्वारा- श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिराजवळ, मु. रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली.
ता. जि. गडचिरोली, मो. ९४२३७१४८८३.
इमेल- krishnadas.nirankari@gmail.com

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...



### रात्रभर मित्र-मैत्रिणींसोबत जोरदार पार्टी, एअर होस्टेस तरुणीचा मृत्यू

नवी दिल्ली : दिल्लीला लागून असलेल्या गुरुग्राममध्ये एका एअर होस्टेसच्या संशयास्पद मृत्यूमुळे खळबळ उडाली आहे. मूळची पंजाबमधील मोहाली येथील 22 वर्षीय एअर होस्टेस सिमरन डडवाल दिल्लीत राहत होती, आणि एअर इंडियामध्ये काम करत होती. शनिवारी दि. 27 डिसेंबर रोजी रात्री सिमरन तिच्या एका मैत्रिणीच्या फ्लॅटला गेली होती. तिथे तिने मैत्रिणींसोबत पार्टी केली. त्यानंतर तिची तब्येत अचानक बिघडली. तिच्या मैत्रिणींनी तिला तातडीने रुग्णालयात नेलं, जिथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. ही घटना डीएलएफ फेज 1 मध्ये घडली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी सिमरनचा मृतदेह ताब्यात घेतला आणि तो पोस्टमॉर्टमसाठी पाठवला. मिळालेल्या माहितीनुसार, सिमरन पूर्वी विस्तारा एअरलाइन्समध्ये काम करत होती. ती दोन वर्षांपासून एअर इंडियामध्ये फ्लाइट अटेंडंट होती. शनिवारी रात्री, सिमरन गुरुग्रामच्या डीएलएफ फेज 1 मध्ये फ्लॅट भाड्याने घेतलेल्या तिच्या मैत्रिणी नितिकाला भेटायला आली होती. नितिका, जी स्वतः एअर होस्टेस आहे, ती देखील फ्लॅटवर उपस्थित होती. त्यांनी रात्रभर पार्टी केली. पहाटे 5 वाजण्याच्या सुमारास, सिमरनला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. तिच्या मैत्रिणींनी तिला आर्टेमिस हॉस्पिटलमध्ये नेलं, जिथे तिला मृत घोषित करण्यात आलं.

### बलरामपूरमध्ये प्रेमप्रकरणातून उघडकीस आलेले कटकारस्थान..

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील बलरामपूर येथे एका धक्कादायक घटनेत प्रेमप्रकरण, फसवणूक आणि हत्येचे प्रकरण उघडकीस आले आहे. एका तरुणीचा साखरपुडा झाला होता. मात्र यादरम्यान तिच्या होणाऱ्या नवऱ्याचे त्याचे गावातील दुसऱ्या मुलीशी प्रेमसंबंध सुरू झाले. यातून निर्माण झालेल्या संघर्षातून तरुणीची हत्या करण्यात आली आणि आत्महत्येचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी तिघांना अटक केली आहे. ही घटना बलरामपूर जिल्ह्यातील रेहरा बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात घडली. एका कुटुंबाने मोठ्या उत्साहात आपल्या मुलीचा साखरपुडा गोंडा जिल्ह्यातील खुरदवा गावातील इमरान नावाच्या मुलाशी केली होता. घरात लग्नाची तयारी सुरू होती आणि नातेवाईकांना आमंत्रण दिले गेले होते. मात्र, या आनंदाच्या वातावरणात एका भयानक वास्तवाची भर पडली. इमरानच्या आयुष्यात त्याच दरम्यान शकीना नावाची दुसरी मुलगी आली. सोशल मीडियावर सुरू झालेली त्यांची ओळख लवकरच प्रेमप्रकरणात बदलली. शकीनाला इमरानचे लग्न ठरले असल्याची माहिती होती, तरीही त्यांचे संबंध वाढत गेले. जेव्हा इमरानच्या होणाऱ्या पत्नीला या प्रेमप्रकरणाची माहिती मिळाली आणि तिने विरोध केला, तेव्हा हा विरोधच तिच्या मृत्यूचे कारण ठरला. पोलिसांच्या तपासात असे समोर आले की, इमरान आणि शकीनाने या अडथळ्याला कायमचे दूर करण्याची योजना आखली. या षडयंत्रात शकीनाची आई जैनब देखील सामील झाली. २३ डिसेंबर रोजी शकीनाने एका बहाण्याने आपल्या प्रियकराच्या होणाऱ्या पत्नीला घरी बोलावले. तरुणीला कदाचित बोलणी करून प्रकरण मिटवण्याची अपेक्षा असेल, पण तिला हे माहीत नव्हते की ती मृत्यूच्या जाळ्यात पाऊल ठेवत आहे.

# रामदास आठवलेंचा मुंबईत 'राजकीय बॉम्ब':महायुतीने डावलल्याने 39 उमेदवार रिंगणात उतरवले, भाजप-सेनेची डोकेदुखी वाढणार?

दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचा तिढा सुटत असतानाच, महायुतीमधील महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'आठवले गटाने बंडाचे निशाण फडकवले आहे. "भाजप आणि शिवसेनेने (शिंदे गट) आमच्याशी विश्वासघात केला आहे," असा घणाघाती आरोप करत रामदास आठवले यांनी मुंबईत स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली. रिपाईने आज 39 उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली असून, मुंबईत दलित मतांच्या विभाजनामुळे भाजप-शिंदे सेनेची डोकेदुखी वाढणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महायुतीच्या नेत्यांनी रिपाइंला ७ जागा देण्याचे आश्वासन दिले होते. यासंदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री स्तरावर चर्चाही झाली होती. मात्र, भाजपने 137 आणि शिवसेनेने 90जागांची घोषणा केली, पण या यादीत रिपाईच्या एकाही उमेदवाराचे नाव समाविष्ट करण्यात आले नाही. अर्ज भरण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असतानाही महायुतीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने रामदास आठवले यांनी आक्रमक पवित्रा घेत, आपल्या पक्षाच्या 39 उमेदवारांची यादी जाहीर केली.

मुंबईतील अनेक वॉर्डांमध्ये आंबेडकरी समाजाची मते निर्णायक आहेत. विशेषतः ईशान्य मुंबई, उत्तर-मध्य मुंबई आणि चेंबूर-भांडुप पट्ट्यात रिपाइंला मानणारा मोठा वर्ग आहे. आजवर ही मते महायुतीच्या पारड्यात पडत होती. मात्र, आता रिपाईने 39 उमेदवार मैदानात उतरवल्यामुळे दलित मतांचे विभाजन अटळ आहे. मुंबईच्या निवडणुकीत जिथे 100-200 मतेही जय-पराजयाचे गणित बदलू शकतात, तिथे रिपाइंचा हा 'स्वबळ' पॅटर्न भाजप-सेनेसाठी धोक्याची घंटा ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना आठवले म्हणाले की, "आम्ही शेवटपर्यंत संयम राखला. 7 जागांची आमची माफक मागणी होती, पण आम्हाला झुलवत ठेवण्यात आले. आमच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप आहे. त्यामुळेच आम्ही मुंबईच्या अस्मितेसाठी आणि आमच्या हक्कासाठी 39 जागांवर लढण्याचा निर्णय घेतला आहे."



# संभाजीनगरात महायुतीचा पोपट मेला

## भाजपचा हट्ट आणि अंहकार यामुळेच युती टिकू शकली नाही, संजय शिरसाट यांचा थेट आरोप

दिव्य वतन /वृत्तसंस्था



छत्रपती संभाजीनगर - संभाजीनगरच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून, महायुती तुटल्याची अधिकृत घोषणा शिवसेना शिंदे गटाचे नेते तसेच मंत्री संजय शिरसाट यांनी केली आहे. भाजपचा हट्ट आणि अंहकार यामुळेच ही युती टिकू शकली नाही, असा थेट आणि तीव्र आरोप शिरसाट यांनी केला. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संभाजीनगरमध्ये भाजपकडून सातत्याने दबावाचे राजकारण केले जात होते. जागावाटपात शिवसेनेला डावलण्याचा प्रयत्न झाला, तसेच स्थानिक नेत्यांचा सन्मान न राखता एकतर्फी निर्णय लादले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.शिरसाट म्हणाले की, महायुती ही समानतेच्या तत्वावर उभी असते, मात्र संभाजीनगरमध्ये भाजपने भागीदार पक्षाला गृहित धरले. अनेक बैठका, चर्चा आणि समन्वयाचे प्रयत्न करूनही भाजपकडून कोणतीही लवचिकता दाखवण्यात आली नाही. अखेर स्वाभिमान आणि कार्यकर्त्यांचा आत्मसन्मान जपण्यासाठी युती तोडण्याचा कठोर निर्णय घ्यावा लागला, असे त्यांनी स्पष्ट केले.

या घोषणेमुळे संभाजीनगरच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, आगामी महापालिका निवडणुकीत आता थेट आणि तिरंगी लढतीचे चित्र स्पष्ट होत आहे. महायुतीतील या महास्फोटामुळे भाजपसह सर्वच पक्षांच्या रणनीतींवर मोठा परिणाम होणार असल्याचे बोलले जात आहे.छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक 2026 च्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारी घडामोड समोर आली आहे. सत्ताधारी महायुतीमधील एक महत्त्वाचा घटक असलेल्या शिंदे गटाच्या शिवसेनेने भाजपसोबतची युती तोडण्याचा निर्णय घेतल्याची अधिकृत घोषणा मंत्री संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत केली. भाजपच्या भूमिकेमुळे आणि सातत्याने दाखवण्यात आलेल्या अहंकारी वृत्तीमुळेच हा निर्णय घ्यावा लागला, असा थेट आणि तीव्र आरोप त्यांनी केला. या घोषणेमुळे संभाजीनगरमधील शिंदेसेना-भाजप युतीला मोठा धक्का बसला असून, आगामी महापालिका निवडणुकीचे राजकीय गणित पूर्णपणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत.संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले की, संभाजीनगरमध्ये युती व्हावी, यासाठी राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाकडूनही गंभीर प्रयत्न करण्यात आले होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालून युतीसाठी वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला. स्थानिक पातळीवर अनेक वेळा बैठका घेण्यात आल्या. चर्चा झाल्या आणि समन्व याचा प्रयत्न करण्यात मात्र, सुरुवातीपासूनच भाजपच्या स्थानिक कार्यकर्ते आणि नेत्यांची भूमिका वेगळी असल्याचे जाणवत होते. युतीबाबत बोलण्यात काही आणि प्रत्यक्ष कृतीत काही, अशी परिस्थिती निर्माण होत होती, ज्यामुळे शंका बळावत गेल्या, असे शिरसाट यांनी सांगितले.

युती वाचवण्यासाठी आपण स्वतः सातत्याने प्रयत्न केल्याचेही संजय शिरसाट यांनी नमूद केले. स्थानिक नेत्यांशी फोनवरून चर्चा करण्यात आल्या. भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू मानले जाणारे चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबतही सविस्तर बैठक झाली, असे त्यांनी स्पष्ट केले. या चर्चांमधून काही सकारात्मक संकेत मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र, बैठका आणि चर्चांनंतरही भाजपच्या भूमिकेत फारसा बदल झाला नाही.

# सोलापुरात अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मोठा राडा

दिव्य वतन /वृत्तसंस्था



इरफान शेख, सोलापूर: सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत संपताच शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले. दुपारी ठरलेल्या वेळेनुसार निवडणूक अधिकाऱ्यांनी अर्ज स्वीकारण्याची वेळ संपल्याने कार्यालयाचे दार बंद केले. मात्र भाजप पदाधिकारी वेळेत न आल्याने मोठा वाद निर्माण झाला.

भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि भाजप शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर हे दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास उमेदवारी अर्ज भरण्याच्या ठिकाणी दाखल झाले. मात्र दुपारी तीन वाजता निवडणूक अधिकाऱ्यांनी अधिकृतपणे अर्ज प्रक्रिया थांबवून दार बंद केले. त्यानंतर भाजप नेते कार्यालयात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत असताना इतर पक्षांच्या नेत्यांनी त्यांना अडवले.

वेळ संपल्याने कोणालाही प्रवेश देऊ नये, अशी भूमिका घेत शिवसेना (शिंदे गट) नेते अमोल शिंदे, काँग्रेस शहर अध्यक्ष चेतन नरोटे आणि शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष अजय दासरी यांनी भाजप नेत्यांचा जोरदार विरोध केला. यावेळी निवडणूक अधिकारी कार्यालयाबाहेर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली आणि काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

या गदारोळानंतर भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी माध्यमांशी बोलताना खुलासा केला. आम्ही कोणतेही अर्ज भरण्यासाठी आलो नव्हतो, तर उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांच्या पोहोच पावत्या घेण्यासाठी आलो होतो, असे त्यांनी सांगितले. आमच्या सर्व उमेदवारांना वेळेत एबी फॉर्म देण्यात आले असून, सर्व अर्ज नियमानुसार दाखल झाले आहेत, असा दावा त्यांनी केला. विरोधकांनी विनाकारण गोंधळ घातल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, निवडणूक अधिकारी कार्यालयाबाहेर सर्व पक्षांचे नेते एकत्र आले.

शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत भाजप आमदार आणि शहर अध्यक्षांना कडाडून विरोध केला. अखेर या सर्व पक्षीय दबावामुळे भाजप नेत्यांना तेथून माघार घ्यावी लागली.

दरम्यान, आज घडलेल्या या घटनेमुळे सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# तेराव्याला अख्खा गाव जेवला, मग म्हैस मेली आता 200 गावकरी हॉस्पिटलात, परिसरात घबराट

दिव्य वतन /वृत्तसंस्था



लखनऊ: उत्तर प्रदेशच्या बदायूमधील एक गाव सध्या दहशतीत आहे. ग्रामस्थ धावत पळत रुग्णालय गाठत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी गावात तेराव्याचं जेवण होतं. त्या जेवणातील कोशिंबीरीमुळे आता अनेकांचा जीव टांगणीला लागला आहे. अनेकांना रेबीज होण्याची भीती वाटू लागली आहे.

बदायू जिल्ह्यातील उझानी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पिपरौल गावात काही दिवसांपूर्वी एका व्यक्तीचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याचं तेरावं घालण्यात आलं. त्यासाठी मोजकेच पदार्थ ठेवण्यात आले होते. तेराव्यासाठी कोशिंबीरही तयार करण्यात आली होती. गावातच राहणाऱ्या प्रमोद साहू यांच्या म्हैशीच्या दुधापासून कोशिंबीर तयार करण्यात आली होती. काही दिवसांपूर्वी प्रमोद यांच्या म्हैशीला एक कुत्रा चावला होता. त्या कुत्र्याचं मानसिक संतुलन बिघडलेलं होतं. कुत्रा चावल्यानं म्हैशीत रेबीजची लक्षणं दिसू लागली. त्यानंतर या म्हैशीचा मृत्यू झाला. मृत पावलेल्या म्हैशीच्या दुधापासून तयार करण्यात आलेली कोशिंबीर खाल्ल्यानं ग्रामस्थांना रेबीज होऊ शकेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे गावात दहशत पसरली.

रेबीजच्या भीतीनं ग्रामस्थांनी रुग्णालय गाठण्यास सुरुवात केली. आतापर्यंत जवळपास २०० जण रुग्णालयात दाखल झाले आहेत. त्यांनी अँटी रेबीज लस घेतली आहे. मुख्य आरोग्य अधिकाऱ्यांनी या घटनेची दखल घेतली आहे. कोशिंबीर खाल्लेल्या लोकांनी रुग्णालयात जाऊन अँटी रेबीज लस घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं. त्यानंतर ग्रामस्थांनी मोठ्या संख्येनं रुग्णालय गाठलं.

# अमेरिकन थिंक टँकचा दावा- 2026 मध्ये भारत-पाक युद्ध शक्य:काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया

दिव्य वतन /वृत्तसंस्था



अमेरिकेच्या मोठ्या थिंक टँक 'कौन्सिल ऑन फॉरेन रिलेशन्स' (CFR) ने इशारा दिला आहे की 2026 मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात पुन्हा युद्ध होऊ शकते. CFR च्या 'कॉन्फ्लिक्ट्स टू वॉच इन 2026' या अहवालानुसार, काश्मीरमधील दहशतवादी कारवाया वाढल्याने दोन्ही देशांमध्ये संघर्षाची मध्यम शक्यता आहे.

अहवालात म्हटले आहे की, जर भारत-पाकिस्तानमध्ये संघर्ष झाला, तर त्याचा अमेरिकेच्या हितांवरही मध्यम स्तरापर्यंत परिणाम होऊ शकतो. जरी जम्मू-काश्मीरमध्ये अद्याप कोणताही मोठा दहशतवादी हल्ला झाला नसला तरी, गुप्तचर संस्थांनुसार या हिवाळ्यात जम्मू प्रदेशात 30 हून अधिक पाकिस्तानी दहशतवादी सक्रिय आहेत.दरम्यान, भारत-पाकिस्तानमध्ये 10 मे रोजी झालेल्या शस्त्रसंधीनंतरही दोन्ही देशांनी शस्त्रास्त्रांची खरेदी वाढवली आहे. भारतातील संरक्षण अधिग्रहण परिषदेने (DAC) अलीकडेच 79 हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी दिली आहे, ज्यात ड्रोन, एअर-टू-एअर क्षेपणास्त्रे आणि गाइडेड बॉम्ब यांचा समावेश आहे.

तिकडे पाकिस्ताननेही तुर्कस्तान आणि चीनकडून नवीन ड्रोन आणि एअर डिफेन्स सिस्टीम खरेदी करण्यासाठी चर्चा सुरू केली आहे, जेणेकरून ऑपरेशन सिंदूर दरम्यान समोर आलेल्या कमतरता दूर करता येतील.अहवालात आणखी एका मोठ्या धोक्याकडे लक्ष वेधले आहे. CFR नुसार, 2026 मध्ये पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात सशस्त्र संघर्षाची मध्यम शक्यता आहे, तथापि, याचा अमेरिकेच्या हितांवर कमी परिणाम होईल.ऑक्टोबरमध्ये 2600 किलोमीटर लांब ड्युरंड लाईनवर पाकिस्तान आणि तालिबानशासित अफगाणिस्तान यांच्यात भीषण चकमकी झाल्या होत्या. दोन्ही देशांच्या सैन्याने अनेक भागांमध्ये एकमेकांवर गोळीबार केला होता आणि सीमा चौक्या उद्ध्वस्त झाल्याचे दावे केले होते. त्यानंतर दोन्ही देशांचे संबंध आणि व्यापार मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले आहेत.

CFR चा हा अहवाल अमेरिकन परराष्ट्र धोरण तज्ज्ञांच्या सर्वेक्षणावर आधारित आहे. याचा उद्देश अमेरिकन धोरणकर्त्यांना अशा क्षेत्रांबद्दल सावध करणे आहे, जिथे भविष्यात संघर्ष पेटू शकतो. अहवालात संघर्षांना टियर-1, टियर-2 आणि टियर-3 अशा तीन श्रेणींमध्ये विभागले आहे, जेणेकरून संघर्षाची शक्यता आणि त्याचा परिणाम किती गंभीर असू शकतो हे समजून घेता येईल.

हा अहवाल सूचित करतो की येत्या काही वर्षांत दक्षिण आशिया पुन्हा एकदा मोठ्या भू-राजकीय तणावाचे केंद्र बनू शकते, ज्यात भारत-पाकिस्तान आणि पाकिस्तान-अफगाणिस्तान या दोन्ही आघाड्यांवर परिस्थिती बिघडण्याचा धोका कायम आहे.

# मुंबईत प्रकाश सुर्वेंना शिवसैनिकांनी दाखवले काळे झेंडे

## :प्रभाग क्रमांक 3 ची जागा भाजपला सोडल्याने कार्यकर्ते आक्रमक; प्रकाश दरेकरांच्या उमेदवारीला विरोध

दिव्य वतन /वृत्तसंस्था



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे यांना शिवसैनिकांकडून काळे झेंडे दाखवण्यात आले आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रभाग क्रमांक 3 भाजपला सोडल्याने नाराज शिवसैनिकांनी प्रकाश सुर्वे यांच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

मुंबई महापालिकेचा प्रभाग क्रमांक 3 मध्ये प्रकाश सुर्वे यांनी प्रकाश पुजारी यांना निवडणुकीसाठी तयारी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु, ऐनवेळी हा वॉर्ड भाजप नेते प्रवीण दरेकर यांचे भाऊ प्रकाश दरेकर यांना सोडण्यात आला, यामुळे नाराज शिवसैनिकांनी आमदार प्रकाश सुर्वे यांच्या विरोधात निदर्शने केली.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठीचा अर्ज भरण्यासाठी अवघा एक तास उरलेला असताना मागाठाणे विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटात असंतोष उफाळून आल्याचे पाहायला मिळाले. या मतदारसंघातील इच्छुक उमेदवार वैष्णवी पुजारी यांना डावलून बाहेरचा उमेदवार भाजपकडून लादण्यात आल्याने याचा निषेध करण्यासाठी शिंदे गटाचे शाखाप्रमुख प्रकाश पुजारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवत आमदार प्रकाश सुर्वे आणि उमेदवार प्रकाश दरेकर यांचा जोरदार निषेध नोंदवला.

आमदार प्रकाश सुर्वे यांच्या मुलाच्या उमेदवारीसाठी इतर मतदारसंघात तडजोड करावी लागल्याने हा मतदारसंघ भाजपला गेल्याचा दावा प्रकाश पुजारी यांनी केला आहे. तसेच या ठिकाणी कार्यकर्त्यांना अंधारात ठेऊन वरिष्ठ नेत्यांनी बाहेरच्या उमेदवाराला उमेदवारी जाहीर केल्याचे वैष्णवी पुजारी यांनी म्हटले आहे.

दहिसरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे आमदार प्रकाश सुर्वे यांच्याविरोधात शिवसैनिकांनी आक्रमक पवित्रा घेत जोरदार निदर्शने केली आहेत. वॉर्ड क्रमांक 3 मधून प्रकाश पुजारी यांच्या मुलीला उमेदवारी मिळण्याचे संकेत आमदार सुर्वे यांनी दिले होते आणि त्यांना निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचनाही केल्या होत्या. मात्र, ऐनवेळी ही जागा शिवसेनेऐवजी भाजपकडे गेल्याने संतापलेल्या पुजारी आणि त्यांच्या समर्थकांनी सुर्वे यांना काळे झेंडे दाखवून त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

या वादाचे मुख्य कारण म्हणजे वॉर्ड क्रमांक 3 मधून भाजपने विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांचे भाऊ प्रकाश दरेकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीमध्ये झालेल्या जागावाटपानुसार, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला 90 जागा मिळाल्या आहेत, तर भाजप 137 जागांवर निवडणूक लढवणार आहे. या जागावाटपामुळे इच्छुक उमेदवार डावलले गेल्याने सध्या दहिसरमध्ये शिंदे गटातील अंतर्गत नाराजी उघडपणे समोर आली आहे.

# टी-20 विश्वचषकासाठी इंग्लंडच्या प्रोव्हिजनल संघाची घोषणा

## वेगवान गोलंदाज जोश टंगला संधी; श्रीलंका दौऱ्यासाठीही संघ जाहीर

इंग्लंड क्रिकेट बोर्ड (ECB) ने ICC पुरुष टी-20 विश्वचषक २०२६ साठी इंग्लंडचा तात्पुरता संघ जाहीर केला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठीही संघ जाहीर करण्यात आला आहे. विश्वचषकापूर्वी संघाच्या तयारीसाठी हा दौरा खूप महत्त्वाचा मानला जात आहे.

टी-२० विश्वचषक संघाचे कर्णधारपद हॅरी ब्रूककडे सोपवण्यात आले आहे. १५ खेळाडूंच्या या संघात जोश टंगलाही स्थान मिळाले आहे. टंगने अद्याप आंतरराष्ट्रीय मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये पदार्पण केलेले नाही.

आर्चरचा विश्वचषक संघात समावेश

जोस बटलर, सॅम करन, फिल सॉल्ट आणि आदिल रशीद यांसारख्या अनुभवी खेळाडूंची संघात निवड करण्यात आली आहे. वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचा विश्वचषक संघात समावेश करण्यात आला आहे, मात्र तो श्रीलंका दौऱ्यावर जाणार नाही.

टी-20 विश्वचषकासाठी इंग्लंडचा तात्पुरता संघ

हॅरी ब्रूक (कर्णधार), रेहान अहमद, जोफ्रा आर्चर, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर, सॅम करन, लियाम डॉसन, बेन डकेट, विल जॅक्स, जेमी ओव्हरटन, आदिल रशीद, फिल सॉल्ट, जोश टंग, ल्यूक वुड.

22 जानेवारीपासून श्रीलंका दौरा सुरू होणार

श्रीलंका दौऱ्यावर इंग्लंडला तीन एकदिवसीय आणि तीन टी-20 सामने खेळायचे आहेत. हा दौरा 22 जानेवारीपासून सुरू होईल. एकदिवसीय संघात जो रूटचे पुनरागमन झाले आहे, ज्यामुळे फलंदाजीला बळकटी मिळेल. ईसीबीनुसार, ही मालिका खेळाडूंना विश्वचषकापूर्वी परिस्थितीशी जुळवून घेण्याची आणि योग्य संयोजन निश्चित करण्याची चांगली संधी देईल.

श्रीलंकेविरुद्ध टी-20 संघ

हॅरी ब्रूक (कर्णधार), रेहान अहमद, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर, ब्रायडन कार्स, सॅम करन, लियाम डॉसन, बेन डकेट, विल जॅक्स, जेमी ओव्हरटन, आदिल रशीद, फिल सॉल्ट, जोश टंग, ल्यूक वुड.

श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय संघ

हॅरी ब्रूक (कर्णधार), रेहान अहमद, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर, ब्रायडन कार्स, झॅक क्रॉली, सॅम करन, लियाम डॉसन, बेन डकेट, विल जॅक्स, जेमी ओव्हरटन, आदिल रशीद, जो रूट, ल्यूक वुड.



# शान मसूदने सहवागचा 19 वर्षांचा जुना विक्रम मोडला

### पाकिस्तानमध्ये सर्वात जलद फर्स्ट-क्लास दुहेरी शतक झळकावले; 177 चेंडूंमध्ये डबल सेंच्युरी

पाकिस्तानचे कसोटी कर्णधार शान मसूद याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्यांनी पाकिस्तानच्या भूमीवर प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सर्वात जलद द्विशतक झळकावत भारताचे माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग यांचा 19 वर्षांचा जुना विक्रम मोडला.

ही कामगिरी शान मसूद यांनी सोमवारी कराची येथे खेळल्या जात असलेल्या प्रेसिडेंट्स ट्रॉफी ग्रेड-I 2025/26 च्या सामन्यात केली. हा सामना सुई नॉर्दर्न गॅस पाइपलाइन्स लिमिटेड (SNGPL) आणि साहिर असोसिएट्स यांच्यात खेळला जात आहे, ज्यात मसूद SNGPL कडून मैदानात उतरले.

मसूद यांनी केवळ 177 चेंडूंमध्ये आपले द्विशतक पूर्ण केले. यापूर्वी वीरेंद्र सेहवाग यांनी 2006 मध्ये लाहोर येथे पाकिस्तानविरुद्ध 182 चेंडूंमध्ये द्विशतक झळकावले होते.

शान मसूदने पाकिस्तानच्या सर्वात जलद द्विशतकाचा विक्रमही मोडला. यापूर्वी हा विक्रम इंजमाम-उल-हकच्या नावावर होता, ज्याने 1992 मध्ये 188 चेंडूंमध्ये द्विशतक झळकावले होते.




सामन्याच्या पहिल्या दिवशी SNGPL ला प्रथम फलंदाजीसाठी उतरवण्यात आले. संघाची पहिली विकेट अजान अवैसच्या रूपात 53 धावांवर पडली. यानंतर शान मसूद आणि अली जरयाबने दुसऱ्या विकेटसाठी 390 धावांची मोठी भागीदारी केली. ही भागीदारी पाकिस्तानमधील कोणत्याही विकेटसाठी नववी सर्वात मोठी भागीदारी ठरली.

अली जरयाबने 237 चेंडूंमध्ये 192 धावा केल्या, तर शान मसूद दिवसाचा खेळ संपेपर्यंत 185 चेंडूंमध्ये 212 धावा करून नाबाद राहिला. त्याचा स्ट्राइक रेट 114 पेक्षा जास्त होता. पहिल्या दिवसाच्या अखेरपर्यंत SNGPL ने 82.1 षटकांत 2 गडी गमावून 460 धावा केल्या होत्या.



# श्रेयस अय्यरला फिटनेस क्लिअरन्स मिळाले नाही

### वैद्यकीय अहवालाच्या आधारे दावा- वनडेसाठी फिट नाही

भारतीय फलंदाज श्रेयस अय्यरला टीम इंडियात परत येण्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल. त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे संघात निवडले जाणार नाही. अय्यर सध्या बेंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये (उत्कृष्टता केंद्र) उपचार घेत आहे. या आठवड्यात त्याच्या रिकव्हरीचे (उपचारांचे) मूल्यांकन केले जात आहे.

बीसीसीआयच्या सूत्रांनी भास्करला सांगितले आहे की, वैद्यकीय पथक लवकरच आपला अहवाल देईल. श्रेयस वनडे क्रिकेटसाठी पूर्णपणे फिट झालेला नाही. त्यामुळे संघात त्याची निवड होणे कठीण आहे.

निवड समिती एक-दोन दिवसांत 3 सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी संघाची घोषणा करेल. पहिला सामना 11 जानेवारी रोजी बडोद्यात खेळला जाईल.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यात अय्यर जखमी, प्लीहामध्ये दुखापत झाली होती

श्रेयस अय्यर ऑस्ट्रेलिया दौऱ्यात जखमी झाले होते. त्यांना 25 ऑक्टोबर रोजी सिडनीमध्ये खेळल्या गेलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात दुखापत झाली होती. त्यांना सिडनी येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

अय्यरने बॅकवर्ड पॉइंटवरून मागे धावत जाऊन अॅलेक्स कॅरीचा शानदार झेल घेतला. यावेळी त्यांच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली. यानंतर ते ड्रेसिंग रूममध्ये परतले आणि त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले.

स्प्लीन (प्लीहा/तिल्ली) शरीराचा एक महत्त्वाचा अवयव आहे. जो पोटाच्या डाव्या बाजूला बरगड्यांखाली असतो. त्याचे मुख्य कार्य रक्त शुद्ध करणे आहे. तो जुन्या आणि खराब झालेल्या लाल रक्तपेशींचा नाश करतो. एवढेच नाही तर, तो शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतो. हा स्प्लीन (प्लीहा) संक्रमणाशी लढण्यास मदत करतो आणि गरज पडल्यास रक्त व प्लेटलेट्स साठवून सोडतो.



# क्रिस्टन बीम्सला कोचिंग स्टाफमध्ये समाविष्ट केले:माजी ऑस्ट्रेलियन लेग स्पिनरला स्पिन बॉलिंग प्रशिक्षकपदाची जबाबदारी दिली

डिफेंडिंग चॅम्पियन मुंबई इंडियन्स (MI) ने महिला प्रीमियर लीग (WPL) 2026 साठी माजी ऑस्ट्रेलियन लेग स्पिनर क्रिस्टन बीम्स यांची स्पिन बॉलिंग कोच म्हणून नियुक्ती केली आहे.

41 वर्षीय बीम्स ऑस्ट्रेलियासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळल्या आहेत.

क्रिस्टन बीम्स यांनी यापूर्वी विमेन्स बिग बॅश लीग (WBBL), द हंड्रेड आणि ऑस्ट्रेलियाच्या अंडर-19 महिला संघात प्रशिक्षकाची भूमिका बजावली आहे. खेळाडू म्हणून त्यांनी ऑस्ट्रेलियासाठी 1 कसोटी, 30 एकदिवसीय आणि 18 टी-20 सामने खेळले होते.

मुंबई इंडियन्सच्या कोचिंग स्टाफमध्ये आता हेड कोच लिसा कीटली (MI सोबत त्यांचा हा पहिला सीझन, यापूर्वी दिल्ली कॅपिटल्सच्या कोच), बॉलिंग कोच आणि मेंटर झूलन गोस्वामी, बॅटिंग कोच देविका पलशिकर आणि फील्डिंग कोच निकोल बोल्टन यांच्यासोबत क्रिस्टन बीम्स यांचाही समावेश झाला आहे.

बीम्स म्हणाल्या-झूलन गोस्वामीसोबत काम करणे अभिमानाची गोष्ट

एमआयच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये क्रिस्टन बीम्स म्हणाल्या, 'ही माझ्यासाठी एक उत्तम संधी आहे. झूलन गोस्वामीसारख्या दिग्गज खेळाडूंसोबत काम करणे खूप खास आहे. मी त्यांच्याविरुद्ध खेळले आहे आणि आता त्यांच्यासोबत काम करणे माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. मुंबई इंडियन्सने एक मजबूत विजयी संस्कृती निर्माण केली आहे आणि हा संघ एका कुटुंबासारखा आहे.'

MI चे दोन WPL विजेतेपद

मुंबई इंडियन्सने आतापर्यंत झालेल्या तीन WPL हंगामांपैकी दोनमध्ये विजेतेपद पटकावले आहे. WPL 2026 ची सुरुवात 9 जानेवारीपासून होईल, ज्यात MI चा पहिला सामना 2024 च्या विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB) सोबत होईल. ही 28 दिवसांची स्पर्धा नवी मुंबई आणि वडोदरा येथे खेळली जाईल.




पहिल्यांदाच WPL जानेवारी-फेब्रुवारीच्या कालावधीत आयोजित केले जात आहे. गेल्या महिन्यात झालेल्या लिलावात MI ने बहुतेक खेळाडूंना कायम ठेवले आणि काहींना पुन्हा विकत घेतले. क्रिस्टन बीम्सच्या समावेशामुळे संघाची फिरकी गोलंदाजी आणखी मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

## अर्थविश्व...

### चांदीचा बुडबुडा फुटणार..? किंमतीतील प्रचंड तेजीवर बड्या गुंतवणूकदाराचा इशारा



मंगळवारी चांदीच्या किमतीत मोठी वाढ झाली. MCX म्हणजेच मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर मार्च महिन्यात डिलिव्हरी होणाऱ्या चांदीची किंमत प्रति किलो 2.37 लाख रुपयांच्या पुढे गेली. मात्र, याआधी सोमवारी चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली होती, ज्यामुळे गुंतवणूकदारांची चिंता वाढली होती. चांदीची किंमत तब्बल अडीच लाख रुपये प्रति किलोग्रामच्या पुढे गेल्यानंतर अचानक कोसळली होती. काही वेळातच किमतीत 20 हजार रुपयांपेक्षा जास्त घट झाली होती. अशातच, चांदीतील या तेजीवर 'रिच डॅड पुअर डॅड' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक, गुंतवणूकदार रॉबर्ट कियोसाकी यांनी एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. ते म्हणतात की, चांदीच्या किमतीत ही वाढ खरोखरच टिकाऊ आहे की हा एक 'बुडबडा' (Bubble) आहे, यावर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. चांदीच्या या असामान्य वाढीमुळे बाजारातील तज्ज्ञ आपापसात चर्चा करत आहेत. विशेषतः, इतर अनेक वस्तूंच्या तुलनेत चांदी खूप वेगाने महाग होत असल्याने ही चर्चा अधिकच रंगली आहे. जे व्यापारी बेस मेटल (जसे तांबे, लोखंड) आणि मौल्यवान धातू (जसे सोने, चांदी ) या दोन्हीमध्ये गुंतवणूक करतात, ते या किमतीतील बदलांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. किमत वाढ मात्र थांबताना दिसत नाही आहे. त्यामुळे, ही तेजी अशीच टिकून राहील की नाही, याबद्दलची चर्चा आता जोर धरू लागली आहे.रॉबर्ट कियोसाकी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर एक पोस्ट शेअर करून चांदीच्या किमतीबद्दल आपले मत मांडले आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये विचारले आहे, 'चांदीचा बुडबुडा फुटणार आहे का?' त्यांनी हे देखील सांगितले की, ते स्वतः अनेक वर्षांपासून चांदीचे समर्थक आहेत. त्यांनी 1965 मध्ये पहिल्यांदा चांदी खरेदी केली होती. मात्र, आता त्यांना असे वाटते की चांदीतील सध्याची तेजी ही कदाचित FOMO (Fear Of Missing Out - काहीतरी गमावण्याची भीती) मुळे आहे. त्यांनी किमतीत मोठी घसरण होण्याची शक्यता वर्तवली आहे. कियोसाकी यांनी गुंतवणूकदारांना सावध राहण्याचा सल्ला दिला आहे.ते म्हणाले, 'जर तुम्ही चांदीमध्ये गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर धीर धरा. किमतीत घसरण होण्याची वाट पाहा, त्यानंतरच गुंतवणूक करा किंवा करू नका.' या इशाऱ्यानंतरही, त्यांनी चांदीच्या भविष्याबद्दल आपला विश्वास व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, 2026 पर्यंत चांदीची किंमत 100 डॉलर प्रति औंस ( 1 औस म्हणजे 28.5 ग्रॅम) आणि कदाचित 200 डॉलरपर्यंतही पोहोचू शकते. त्यांनी आपल्या 'रिच डॅड' तत्त्वज्ञानाचा एक महत्त्वाचा सिद्धांत पुन्हा एकदा सांगितलाः 'तुमचा नफा तेव्हाच तयार होतो जेव्हा तुम्ही खरेदी करता... विकता तेव्हा नाही.'

### एका महिन्यात 70 टक्क्यांची तेजी, 24 बोनस शेअर देणाऱ्या कंपनीमुळे गुंतवणूकदारांची चांदी



एपिस इंडियाच्या शेअर्समध्ये जबरदस्त तेजी दिसून येत आहे. कंपनीच्या शेअर्सनी मंगळवारी बीएसईमध्ये 5 टक्के अपर सर्किटसह 78.45 रुपयांवर पोहोचले आहेत. यासोबतच कंपनीच्या शेअर्सनी 52 आठवड्यांचा नवीन उच्चांकही गाठला आहे. गेल्या एका महिन्यात कंपनीचे शेअर्स 70 टक्क्यांहून अधिक वाढले आहेत. कंपनीने याच महिन्यात आपल्या भागधारकांना बोनस शेअर्सची भेट दिली आहे. ऑक्टोबर 2022 पासून आतापर्यंत एपिस इंडियाच्या शेअर्समध्ये 9500 टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. एपिस इंडिया ही कंपनी मध, खजूर, फ्रूट जॅम, सेरेल्स, वर्मिसेली, सोया चंक, जिंजर गार्लिक पेस्ट, ग्रीन टी यांसारखी उत्पादने विकते.

गुंतवणूकदार मालामाल

कंपनीने प्रत्येक शेअरवर 24 बोनस शेअर्स दिले आहेत. मल्टीबॅगर कंपनी एपिस इंडियाने याच महिन्यात आपल्या भागधारकांना 24:1 च्या गुणोत्तरामध्ये बोनस शेअर्स दिले आहेत. म्हणजेच कंपनीने प्रत्येक शेअरवर गुंतवणूकदारांना 24 बोनस शेअर्स वाटले आहेत. एपिस इंडियाचे शेअर्स 5 डिसेंबर 2025 रोजी बोनस शेअरच्या रेकॉर्ड डेटवर होते.यापूर्वीही एपिस इंडियाने 323:100 च्या गुणोत्तरामध्ये बोनस शेअर्स दिले होते. कंपनीने डिसेंबर 210 मध्ये प्रत्येक 100 शेअर्सवर 323 शेअर्स दिले होते. मल्टीबॅगर कंपनीमध्ये प्रमोटर्सची हिस्सेदारी 74.72 टक्के आहे. तर, पब्लिक शेअरहोल्डिंग 25.28 टक्के आहे. एपिस इंडियाचे शेअर्स 13 ऑक्टोबर 2022 पासून आतापर्यंत 9585 टक्के वाढले आहेत. 13 ऑक्टोबर 2022 रोजी एपिस इंडियाच्या शेअरची किंमत 81 पैसे होती. कंपनीचे शेअर्स 30 डिसेंबर 2025 रोजी बीएसईमध्ये 78.45 रुपयांवर बंद झाले. गेल्या दोन वर्षांचा विचार केल्यास एपिस इंडियाच्या शेअर्समध्ये 7163 टक्के वाढ झाली आहे. गेल्या एका वर्षात कंपनीचे शेअर्स 599 टक्के वाढले आहेत. तर, गेल्या 6 महिन्यांत कंपनीच्या शेअर्समध्ये 534 टक्के वाढ दिसून आली आहे. गेल्या 3 महिन्यांत एपिस इंडियाचे शेअर्स 177 टक्के वाढले आहेत. कंपनीच्या शेअर्सचा 52 आठवड्यांचा उच्चांक 78.45 रुपये आहे. तर, कंपनीच्या शेअर्सचा 52 आठवड्यांचा नीचांक 11.12 रुपये आहे.

### गुंतवणूकदारांनो लक्ष द्या! नवीन वर्षात 15 दिवस बाजाराला टाळं, 1 जानेवारीचं ट्रेडिंग प्लॅनिंग आजच करा




शेअर बाजार नवीन वर्षापासून अगदी थोड्याच अंतरावर आहे. एनएसई आणि बीएसईने 2026 साठी सुट्टीची यादी जारी केली आहे ज्यानुसार पुढील वर्षी देशांतर्गत बाजार एकूण 15 दिवस बंद राहील. पण 1 जानेवारीला म्हणजे नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी देशांतर्गत मार्केटला सुट्टी असेल की बाजारात सुरळीत कामकाज सुरु राहील याबाबत लोकांमध्ये कन्फ्युजन पायाला मिळत आहे.नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे 1 जानेवारी 2026 रोजी भारतीय शेअर बाजार नियमितप्रमाणे सुरु राहील. एनएसईच्या वेळापत्रकानुसार त्या दिवशी नियमित व्यवहार होतील. भारतीय शेअर बाजार दरवर्षी काही राष्ट्रीय आणि धार्मिक सुट्ट्यांवर तसेच शनिवार आणि रविवारी नियमित सुट्ट्यांच्या दिवशी बंद असतो.

## महत्त्वाचे...

### रेल्वे प्रवाशांनो लक्ष द्या! 1 जानेवारीपासून मुंबई-पुणे गाड्यांच्या वेळा बदलणार



मुंबई: नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी तुम्ही फिरायला जाण्याचा किंवा रेल्वे प्रवासाचा बेत आखला असेल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. १ जानेवारी २०२६ पासून मध्य रेल्वेच्या वेळापत्रकात मोठे बदल होणार आहेत. मुंबई आणि पुण्याला जोडणाऱ्या अनेक महत्त्वाच्या गाड्यांच्या वेळा बदलण्यात आल्या असून, यामध्ये हायस्पीड 'वंदे भारत एक्सप्रेस'चाही समावेश आहे. त्यामुळे घराबाहेर पडण्यापूर्वी तुमच्या गाडीची वेळ एकदा नक्की तपासून घ्या.

नेमका बदल काय आणि का?

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा आणि गाड्यांचा वेग वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. १ जानेवारीपासून लागू होणाऱ्या या नवीन वेळापत्रकामुळे मुंबईहून सुटणाऱ्या आणि मुंबईकडे येणाऱ्या गाड्यांच्या वेळेत ५ ते १५ मिनिटांचा फरक पडणार आहे. अनेक गाड्यांच्या वेळा अलीकडे किंवा पलीकडे करण्यात आल्या आहेत.

मुंबई-पुणे-सोलापूर आणि मुंबई-साईनगर शिर्डी या मार्गावर धावणाऱ्या 'वंदे भारत एक्सप्रेस'च्या वेळापत्रकात काही मिनिटांचे बदल करण्यात आले आहेत. प्रवाशांची वाढती संख्या आणि तांत्रिक सुधारणांमुळे हा बदल करण्यात आल्याचे समजते. यामुळे प्रवाशांना आता सुधारित वेळेनुसार प्लॅटफॉर्मवर उपस्थित राहावे लागणार आहे.

### 16 वर्षीय मुलगा 60 फूट उंचीवरुन...

दिल्ली: मित्रांसोबत रील्स काढताना एका 16 वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उत्तर दिल्लीतील मोडेल टाऊन परिसरात रविवारी (28 डिसेंबर) घडली. मॉलच्या छतावरून तब्बल 60 फूट खाली पडल्याने या मुलाचा जागीच मृत्यू झाला.अशोक विहार येथील एका खासगी शाळेत इयत्ता 11वीत शिकणारा कविन कुमार हा विद्यार्थी आपल्या तीन मित्रांसोबत बराच काळ बंद असलेल्या नॉर्थ गेट मॉलमध्ये गेला होता. फिरणे आणि सोशल मीडियासाठी व्हिडिओ तयार करणे हा त्यांचा उद्देश होता, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

### 16 वर्षीय मुलगा 60 फूट उंचीवरुन...



दिल्ली: मित्रांसोबत रील्स काढताना एका 16 वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उत्तर दिल्लीतील मोडेल टाऊन परिसरात रविवारी (28 डिसेंबर) घडली. मॉलच्या छतावरून तब्बल 60 फूट खाली पडल्याने या मुलाचा जागीच मृत्यू झाला.अशोक विहार येथील एका खासगी शाळेत इयत्ता 11वीत शिकणारा कविन कुमार हा विद्यार्थी आपल्या तीन मित्रांसोबत बराच काळ बंद असलेल्या नॉर्थ गेट मॉलमध्ये गेला होता. फिरणे आणि सोशल मीडियासाठी व्हिडिओ तयार करणे हा त्यांचा उद्देश होता, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, कविनच्या कुटुंबीयांनी या घटनेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. मुलाचे काका सुधीर कुमार यांनी सांगितले की, कविन सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घरातून बाहेर पडला होता. त्याने आईला मित्रांसोबत जवळच बिलियर्ड्स खेळायला जात असल्याचे सांगितले होते. अर्ध्या तासानंतर कविनच्या आईला त्याच्या एका मित्राच्या आईचा फोन आला. मात्र, तो मित्र घटनावेळी कविनसोबत नव्हता, असे त्याच्या पालकांनी स्पष्ट केले.

# नाशकात AB फॉर्मवरून मोठा राडा:भाजप शहराध्यक्षांच्या गाडीचा पाठलाग; संतापलेल्या कार्यकर्त्यांनी फार्महाऊसचे गेट फोडले

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

नाशिक महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपायला अवघे काही तास शिल्लक असताना, भारतीय जनता पक्षामध्ये अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळत आहे. भाजप यंदा नाशिकमध्ये स्वबळावर सर्व १२२ जागा लढवत आहे, मात्र ऐनवेळी 'एबी' फॉर्म न मिळाल्यामुळे इच्छुक उमेदवार आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांचा संयम सुटला आहे. आपला हक्काचा फॉर्म मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांच्या गाडीचा नाशिक-मुंबई महामार्गावर फिल्मी स्टाईलने पाठलाग केला.

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. फॉर्म भरण्यासाठी काही तासच शिल्लक असून, अद्याप इच्छुक उमेदवारांना पक्षाकडून एबी फॉर्म मिळाले नाहीत. नाशिकमध्ये भाजप स्वबळावर लढणार असून, सर्व १२२ जागांवर आपले उमेदवार उभे केलेले आहेत. मात्र, निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांमध्ये नाराजी बघायला मिळत आहे. निष्ठावंतांचे तिकिट कापल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. नाशिकमध्ये मोठा हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला.मिळालेल्या माहितीनुसार, भाजपच्या अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांची तिकिटे कापली गेल्याची चर्चा रात्रीपासून सुरू होती. ज्यांना अद्याप फॉर्म मिळालेले नाहीत, असे अनेक इच्छुक उमेदवार शहराध्यक्ष सुनील केदार यांची भेट घेण्यासाठी जमले होते. मात्र, कार्यकर्त्यांच्या रोषाला सामोरे जाण्याऐवजी केदार यांनी गाडीतून निघून जाणे पसंत केले. यानंतर संतापलेल्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग सुरू केला. हा थरार नाशिक-मुंबई महामार्गावर बराच वेळ सुरू होता.

तर तिकिटाचा काळाबाजार होत असल्याचा खळबळजनक आरोप काही इच्छुक उमेदवारांनी केला आहे.या आरोपांमुळे खळबळ उडाली आहे.

शहराध्यक्ष आणि काही पदाधिकारी एका खाजगी फार्महाऊसवर थांबल्याची माहिती मिळताच कार्यकर्त्यांनी तिथे धडक दिली. फार्महाऊसचे मुख्य गेट बंद असल्याचे पाहून संतप्त कार्यकर्त्यांनी ते चक्क तोडून आत प्रवेश केला.नाशिकच्या राजकारणाचे चाणक्य मानले जाणारे संकटमोचक गिरीश महाजन हे देखील सध्या 'नॉट रिचेबल' असल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे कार्यकर्त्यांमधील अस्वस्थता अधिकच वाढली आहे. नाशिकमधील हा महामार्गावरील थरार आणि गाडीचा पाठलाग यामुळे भाजपची अंतर्गत एकजूट धोक्यात आल्याचे चित्र निर्माण झाले. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या टप्प्यात पक्षाला स्वतःच्याच कार्यकर्त्यांचा



सामना करावा लागत आहे. यामुळे निवडणुकीच्या तयारीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, या संपूर्ण गोंधळानंतर भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार, आमदार राहुल ढिकले, सीमा हिरे यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये तिकीट वाटप सुरु करण्यात आले. मात्र, या ठिकाणी वाढत्या तणावाची शक्यता लक्षात घेता मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तिकीट वाटपाच्या ठिकाणी कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक स्वतः घटनास्थळी दाखल झाले होते.या संपूर्ण गोंधळावर राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. झालेला प्रकार अतिशय चुकीचा होता. नाशिकमध्ये 122 जागा आहेत, पण उमदेवारी मागणाऱ्यांची संख्या हजारमध्ये होती. अनेक इच्छुक उमदेवार होते. बी फॉर्म द्यायचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे आपल्याला तिकिट हवे, असे अनेक इच्छुकांना वाटले. बी फॉर्म देण्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी शे-दीडशे कार्यकर्ते आले आणि त्यांनी गोंधळ घातला.

## संभाजीनगर भाजपमध्ये प्रचंड नाराजी

### सावेंच्या कार्यालयासमोर इच्छुकांचा आक्रोश

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या तिकीट वाटपावरून भारतीय जनता पक्षातील अंतर्गत धुसफूस आता चव्हाट्यावर आली आहे. गेल्या १८ वर्षांपासून पक्षासाठी रक्त आटवणाऱ्या आणि आंदोलनांमध्ये अंगावर १८ केसेस ओढवून घेणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्ती दिव्या उल्हास मराठे यांना पक्षाने डावलल्यामुळे त्यांनी मोठा संताप व्यक्त केला आहे.

प्रबळ उमेदवार असतानाही एका नवख्या उमेदवाराला संधी दिल्याचा आरोप करत दिव्या मराठे यांनी आता थेट प्रचार कार्यालयात धडक देत स्थानिक नेतृत्तवावर हल्ला चढवला. तर पक्षासाठी नोकरी सोडली. खस्ता खाल्ल्या. मात्र, ऐनवेळेस डावलले, असा आरोप करत अतुल सावे यांच्या कार्यालयासमोर आणखी एका इच्छुकाने रोष व्यक्त केला. शेवटी पोलिसांना त्यांना आवरावे लागले.



छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. दिव्या मराठे यांनी प्रभाग क्रमांक २० मधून 'खुल्या प्रवर्ग महिला' गटातून भाजपची उमेदवारी मागितली होती. मात्र, पक्षाने त्यांना डावलून एका अत्यंत कनिष्ठ कार्यकर्त्याच्या पत्नीला तिकीट दिले आहे. या निर्णयामुळे धक्का बसलेल्या दिव्या मराठे यांनी थेट मंत्री अतुल सावे आणि खासदार भागवत कराड यांना जाब विचारला आहे.

आपल्या भावना व्यक्त करताना दिव्या मराठे यांना अश्रू अनावर झाले. त्या म्हणाल्या, "मी गेल्या १८ वर्षांपासून भाजपचा झेंडा खांद्यावर घेऊन फिरतेय. पक्षाच्या कामासाठी माझ्यावर आज १८ केसेस आहेत. जेव्हा पक्षात कोणी नव्हते, तेव्हा आम्ही सोबत होतो. आज पक्ष मोठा झाला म्हणून बाहेरच्यांना आणि ज्यांनी कधी पक्षाचा प्रचारही केला नाही, अशांच्या पत्नीला तिकीट दिले जात आहे. एखाद्या आमदार किंवा खासदाराच्या पत्नीला तिकीट दिले असते, तर मी समजू शकले असते. पण ज्या बाईने कधी पक्षाचे कामच केले नाही, तिला कोणत्या आधारावर तिकीट दिले?"

पक्षाकडून सांगण्यात आले की, सर्वेक्षणात तुमचे नाव आले नाही किंवा वरून (श्रेष्ठींकडून) नाव आले नाही. यावर दिव्या मराठे यांनी संताप व्यक्त केला. त्या म्हणाल्या, "वरून नाव आले नाही म्हणजे काय?वर बसलेल्या नेत्यांना या कार्यकर्त्याची पत्नी कोण आहे हे माहिती आहे का? सर्व्हेत माझेही नाव आले होते, मग केवळ कारणे सांगून मला का डावलले जात आहे?"

२०१५ मध्येही आपल्यासोबत असाच अन्याय झाला होता, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## पुण्यात 'युती-आघाडी' कागदावरच

### धंगेकर विरुद्ध बिडकर हायव्होल्टेज सामना पुन्हा एकदा !

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटपाचा गोंधळ कायम राहिल्याने यंदा पुण्यात अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. भाजप आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना यांच्यातील युती अधिकृतरीत्या जाहीर न झाल्याने दोन्ही पक्षांचे उमेदवार आमने-सामने ठाकले आहेत. तर दुसरीकडे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही समझोता न झाल्याने पुण्यात 'घड्याळ' विरुद्ध 'तुतारी' असा थेट संघर्ष पाहायला मिळणार आहे.

पुण्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष प्रभाग क्रमांक 23 आणि 24 कडे लागले आहे. येथे शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर आणि भाजपचे गटनेते गणेश बिडकर यांच्यातील जुना संघर्ष पुन्हा उफाळून आला आहे.



रवींद्र धंगेकर यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर यांनी प्रभाग क्रमांक 23 मधून, तर मुलगा प्रणव धंगेकर याने प्रभाग क्रमांक 24 मधून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

विशेष म्हणजे, 2017 मध्ये रवींद्र धंगेकर यांनी गणेश बिडकर यांचा पराभव केला होता. आता 2017 च्या त्या अटीतटीच्या लढतीची पुनरावृत्ती होणार असून, यावेळी गणेश बिडकर यांच्यासमोर रवींद्र धंगेकरांच्या पुत्राने, प्रणव धंगेकराने मोठे आव्हान उभे केले आहे.

दोन्ही राष्ट्रवादीत बिघाडी

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवार आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र निवडणूक लढवणार असल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला होता. मात्र, प्रत्यक्षात चित्र वेगळेच दिसत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने पुण्यात नक्की किती जागा लढवायच्या, हे शेवटपर्यंत गुलदस्त्यात राहिले. ज्येष्ठ नेते अंकुश काकडे यांनी 70 हून अधिक उमेदवारांना 'एबी' फॉर्म वाटल्याचे जाहीर केल्याने, दोन्ही राष्ट्रवादीमध्ये अनेक प्रभागांत मैत्रीपूर्ण लढती होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भाजप आणि शिंदे गटातील जागावाटपाची चर्चा अर्जाच्या शेवटच्या मिनिटापर्यंत सुरूच राहिल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. जागावाटप न झाल्याने अनेक ठिकाणी दोन्ही पक्षांनी आपापले उमेदवार मैदानात उतरवले आहेत. त्यामुळे कागदावर दिसणारी युती प्रत्यक्षात मैदानात कुठेही दिसून येत नाही. महायुती असो वा महाविकास आघाडी, दोन्ही बाजूंच्या जागावाटपाचा घोळ मिटला नसल्याने पुण्यात यंदा बहुरंगी आणि चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत.

## उमेदवार शक्तिप्रदर्शन करत आला, पण अर्जच विसरला

### मुंबईत एका पक्षाच्या उमेदवारासोबत घडला विचित्र प्रसंग; कार्यकर्तेही हैराण

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

राज्यात येत्या 15 जानेवारीला मुंबईसह 29 महापालिकांच्या निवडणुकांचा फड रंगणार आहे. आज उमेदवारी भरण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे सर्वच ठिकाणी इच्छुक व पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची पळापळ सुरू झाली आहे.

त्यातच मुंबईतील एका पक्षाच्या उमेदवारासोबत एक विचित्र प्रसंग घडला आहे. हा उमेदवार आपल्या समर्थकांसह वाजंत्री घेऊन उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक कार्यालयात पोहोचला. पण ऐनवेळी उमेदवारी अर्जच आपण आणला नसल्याची बाब त्याच्या लक्षात आली. यामुळे हसावे की रडावे असा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला आज शेवटच्या दिवशी मुलुंड, भांडुप व विक्रोळी परिसरात चांगलाच रंग चढला. टी आणि एस वॉर्डाच्या निवडणूक कार्यालयांबाहेर उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी शक्तिप्रदर्शन करत अर्ज भरण्यास सुरुवात केली. या गदारोळात एका पक्षाचा उमेदवार शक्तिप्रदर्शन करत निवडणूक कार्यालयात पोहोचला. पण तो फॉर्मच विसरल्याने कार्यकर्त्यांत काही काळ हास्याचा फवारा उडाला.

त्याचे झाले असे की, एका पक्षाचा उमेदवार गोवंडी, मानखुर्द, भांडुप, सोनापूर येथील कार्यकर्त्यांना घेऊन शक्तिप्रदर्शन



करत गाड्यांचा ताफा घेऊन टी वॉर्डच्या कालिदास येथील निवडणूक कार्यालयाबाहेर पोहोचला. यावेळी पोलिसांनी गर्दीवर नियंत्रण ठेवत त्याला मोजक्याच कार्यकर्त्यांसह आत जाण्याची परवानगी दिली. आत जाण्यापूर्वी त्याने आपल्या सहकाऱ्यांना अरे फॉर्म कुठाय? असा प्रश्न केला. त्यावर कार्यकर्ते एकमेकांकडे पाहत राहिले. त्यांचा गोंधळ उडाला. अखेर चौकशीअंती उमेदवारी अर्ज घेऊन येणारा कार्यकर्ता गर्दीत मागेच राहिल्याची बाब त्यांच्या लक्षात आली.

यामुळे उमेदवाराची चांगलीच गोची झाली. कार्यालयाबाहेर थांबलेले त्यांचे समर्थक दादा, आत का जात नाहीत? असा प्रश्न करत होते. पण तेवढ्यात कुणीतरी काही नाही, अर्ज विसरलेत,

असे त्यांना सांगितले. हे ऐकताच अनेकांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. त्यानंतर 10-15 मिनिटांनी अर्ज असलेला कार्यकर्ता धापा टाकत निवडणूक कार्यालयात पोहोचला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अखेर उमेदवार आपल्या निवडक कार्यकर्त्यांसह अर्जाची फाईल घेऊन निवडणूक कार्यालयात दाखल झाला आणि आपला अर्ज भरला.

## एकनाथ शिंदेंचा खासदार नरेश म्हस्केंना झटका:मुलाचे तिकीट कापले, ठाण्यातील

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने खासदार नरेश म्हस्के यांच्या मुलाला उमेदवारी नाकारत त्यांना जोरदार झटका दिला आहे. यामुळे ठाण्यातील आनंद आश्रमाबाहेर नरेश म्हस्के यांच्या कार्यकर्त्यांची गर्दी जमली असून, ते आपला वेगळा निर्णय घेतील असा दावा केला जात आहे.

शिवसेनेचे ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांचा मुलगा आशुतोष म्हस्के यांनी ठाणे महापालिका निवडणुकीसाठी तयारी केली होती. ते प्रभाग क्रमांक 19 मधून निवडणूक लढवणार होते. यासाठी त्यांनी या प्रभागात कार्यकर्त्यांची एक मोठी फळी उभी केली होती. तसेच प्रचारही सुरू केला होता.



विशेषतः स्वतः खासदार नरेश म्हस्के यांनीही आपल्या मुलाच्या उमेदवारीसाठी जोर लावला होता. पण पक्षाने ऐनवेळी आशुतोष म्हस्के यांना तिकीट नाकारून त्यांना झटका दिला. यासंबंधीच्या माहितीनुसार, आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

पण अद्याप आशुतोष म्हस्के यांना अद्याप पक्षाचा एबी फॉर्म मिळाला नाही. यामुळे ठाण्यातील आनंद आश्रमाच्या समोर म्हस्के यांच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे. शिंदे गटातील

# अजित पवारांचे गुंडांच्या टोळ्यांना राजकीय पाठबळ

## आंदेकरांच्या घरात दोघांना उमेदवारी, गजा मारणेच्या पत्नीलाही तिकीट

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

महाराष्ट्र कल्याणाची भाषा करणारे, त्यासाठीच काकाला सोडून भाजपसोबत गेल्याचा दावा करणारे अजित पवार यांनी पुण्यात चक्क कुख्यात गुंडांच्या टोळ्यांना राजकीय पाठबळ दिल्याचे समोर आले आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपत असताना, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गजा मारणेंच्या पत्नीनंतर आता स्वतःचा नातू आयुष कोमकर याच्या हत्या प्रकरणात आणि कोट्यवधींच्या खंडणी प्रकरणात येरवडा कारागृहात असलेल्या सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी उदयकांत आंदेकर यांना उमेदवारी दिली आहे.

आंदेकर टोळी म्होरक्या बंडू आंदेकर याच्या कुटुंबाला मिळालेल्या या राजकीय पाठबळामुळे पुण्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे. बंडू आंदेकर कुटुंबाच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे या उमेदवारीबाबत अजित पवार गटाने सुरुवातीपासूनच कमालीची गुप्तता पाळली होती. अधिकृत घोषणा न करता थेट अर्ज भरण्यावर भर देण्यात आला. जेणेकरून विरोधाची धार कमी करता येईल. मात्र, आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणी आंदेकर यांच्या वकिलांनी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात धाव घेत 'एबी' फॉर्म सादर केले आणि ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. आंदेकरांच्या वतीने त्यांच्या वकिलांनीच ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली.

बंडू आंदेकर आणि त्यांच्या कुटुंबातील महिला सदस्यांनी निवडणूक लढवण्यासाठी विशेष न्यायालयाकडे परवानगी मागितली होती. "निवडणूक लढवणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे," असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने त्यांना अर्ज भरण्याची मुभा दिली. मात्र, न्यायालयाने काही कडक अटीही घातल्या आहेत.

यांच्या पक्षाकडून आज सकाळी कुख्यात गुंड गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे हिला उमेदवारी देऊन चर्चेला उधाण आणले होते. आता त्यानंतर लगेचच बंडू आंदेकर कुटुंबाला उमेदवारी दिल्याने, अजित पवारांच्या 'गुन्हेगारीमुक्त पुणे' या घोषणेची खिल्ली उडवली जात आहे. ५ कोटी ४० लाखांच्या खंडणी प्रकरणात आणि हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या व्यक्तींना सत्ताधारी पक्ष उमेदवारी कशी देऊ शकतो, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

गुंड बंडू आंदेकर आणि गुंड गज्या मारणे या दोघांचाही गुन्हेगारीचा तगडा इतिहास आहे. या दोघांची गुन्हेगारी प्रकरणे राज्यभर गाजली आहेत. असे असताना, सत्ताधारी पक्षाने अशा प्रकारे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला पाठबळ दिल्याने पुण्यातील राजकीय वर्तुळात आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

आंदेकर कुटुंबाला देण्यात येणाऱ्या उमेदवारीला आयुषच्या आईने तीव्र विरोध दर्शवला आहे. "आंदेकर टोळीने अनेकांचे संसार उद्ध्वस्त केले आहेत, त्यांना उमेदवारी देऊ नका." जर त्यांना उमेदवारी दिली तर मी पक्ष कार्यालयासमोर आत्मदहन करेन, असा इशारा बंडू आंदेकर याची मुलगी आणि मृत आयुष



कोमकरची आई हिने अजित पवारांना दिला होता. मात्र, या आर्त हाकेकडे दुर्लक्ष करत अजित पवारांच्या पक्षाने आंदेकर कुटुंबातील दोघींना प्रभाग क्रमांक २३ मधून निवडणुकीसाठी तिकीट दिले.दुसरीकडे, गज्या मारणेची पत्नी जयश्री मारणे यांना देखील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून तिकीट देण्यात आले आहे. त्या प्रभाग क्रमांक 10 मधून अधिकृत उमेदवार असतील. त्यांना पक्षाने एबी फॉर्मही दिला आहे. जयश्री मारणे यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिल्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. गजा मारणे सध्या कोथरूडमधील एका दुचाकीस्वाराला मारहाण केल्याप्रकरणी तुरुंगात बंदिस्त आहे. हा दुचाकीस्वार केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयात काम करत होता. त्याला गजा मारणे याच्या टोळीने बेदम मारहाण केली होती.

१ २ ३ ४ ५ ६